kids around the world

KIDStory™

# पायाभूत प्रशिक्षण पुस्तिका

“एक पिढी दुसऱ्या पिढीपुढे त झ्या कृत्यांची प्रशंसा करीत राहील, त्या तुझ्या पराक्रमाचे वर्णन करतील”
स्तोत्र. 145:4

# अनुक्रमणिका


| | पृष्ठे |
|---|---|
| **किडस्टोरी प्रशिक्षण विहंगावलोकन/आढावा** | 4–5 |
| **सत्र 1** | |
| • स्वागत | 6 |
| • येशू मुलांना आशीर्वाद देतो | 6–7 |
| **सत्र 2: पवित्र शास्त्रातील गोष्ट सांगणे/शिकणे म्हणजे काय** | |
| • सार्वत्रिक किंवा वैष्विक सत्ये | 8 |
| • पवित्र शास्त्रातील गोष्टी सांगणे म्हणजे काय | 8 |
| • पाठाची रूपरेषा | 9–10 |
| • फरक काय आहेः/पवित्र षास्त्रातील गोश्टींचे कथन का? | 11 |
| • गोष्टी शिकणे | 12–16 |
| **सत्र 3: गोष्ट सांगणे** | |
| • देवाची शैली | 17 |
| • सादरी करण | 18–19 |
| • अभिव्यक्ती यादी | 20 |
| **गृहपाठ स्वाध्याय** | 21 |
| **सत्र 4: मननात्मक** | 22–23 |
| **सत्र 5: गोष्ट पुन्हा सांगणे** | |
| • खेळ | 24 |
| • कला, नाटक आणि संगीत | 25 |
| **सत्र 6: हरवलेले मेंढरू** | 26 |
| **सत्र 7: शोध आणि प्रतिसाद प्रश्न** | 27–31 |
| • नमुना प्रश्न | 29–31 |
| **सत्र 8: अंतिम स्वाध्याय** | 32–33 |
| • पाठनियोजन तक्ता | 33 |
| **सत्र 9: समाप्ती आणि समर्पण** | 34 |
| **परिशिष्ट** | 35 |


©Kids Around the World 2015

# किडस्टोरी प्रशिक्षण
# विहंगावलोकन/आढावा

सत्र #1: स्वागत आणि येशू मुलांना आशीर्वाद देतो **पृ.6**

रत्न
स्टोरीबोर्ड
चेंडू

- – स्वागत
- – सहभागी होणाऱ्यांसाठी सूचना आणि उद्घाटन
- – प्रस्तावना गोष्ट सांगणे
- – स्टोरीबोर्डच्या साहाय्याने पुन्हा सांगणे
- – खेळाविषयी पुन्हा सांगणे
- – प्रश्न

सत्र #2: पवित्र शास्त्रातील कथा सांगणे म्हणजे काय **पृ.8**

वेल्क्रो

- – कथा सांगणे आणि एस.एस यांच्यातील फरक
- – पाठाची रूपरेषा
- – कथा सांगणे म्हणजे काय आणि का
- – कथा सांगणे आणि प्रस्तावना पाण्यावर चालणे
- – गोष्ट शिकणे
- – गोष्ट रचणे

सत्र #3: गोष्ट सांगणे **पृ.17**

समयदर्शक
कपडे

- देवाची पद्धत
- सादरीकरण

सत्र #4: मननात्मक **पृ.22**

समयदर्शक
दोरी (न्या)
स्टोरीलाइन तक्ते
क्रेयॉन्स
पोस्टर बोर्ड
चिनीमाती खेळणे
पाइप क्लिनर्स
स्टोरीबोर्ड कथा

सत्र #5: गोष्ट पुन्हा सांगणे **पृ.24**

- – विषयाची ओळख करून देणे
- – दोरीचा/खेळाचा उपयोग करणे
- – गोष्ट सांगण्याचा खेळ
- – सराव करण्यासाठी आणि पुन्हा सांगण्याच्या निरनिराळया पद्धतींचा वापर करण्यासाठी गटांत विभागणे
    - गीत लिहा
    - स्टोरीबोर्ड्स
    - पपेट्स (कळसुत्री बाहुल्या)
    - नाटक/भूमिका करणे
    - पोस्टर
    - नाच/मूक अभिनय
    - पाईप क्लिनर्स/चिनीमाती खेळणे
    - खेळ

सत्र #6: हरवलेले मेंढरू **पृ.26**

बीच बॉल

सत्र #7: शोध आणि प्रतिसाद प्रश्न **पृ.27**

- – डोके आणि अंतःकरण
- – प्रतिसाद; केंद्रबिंदू

सत्र #8: अंतिम स्वाध्याय **पृ.32**

समाप्ती आणि समर्पण **पृ.34**

# सत्र #1
# स्वागत आणि येशू मुलांना आशीर्वाद देतो

**स्वागतः** या ठिकाणी किड्स्टोरी प्रशिक्षणामध्ये आम्ही सर्वांचे स्वागत करतो. सर्वजण आपापला परिचय द्या, आणि जर गट छोटा असेल, तर त्यांना आपापसात एकमेकांची ओळख करून घेऊ द्या, आणि ते प्रशिक्षणासाठी का आले आहेत हे एकमेकांना सांगू द्या. मुले महत्त्वाची आहेत, तसेच देवालासुद्धा तसेच वाटते असा आपला विश्वास आहे म्हणून आपण येथे आलो आहोत. प्रत्येकजणाने – मुले आणि प्रौढ व्यक्ती – त्याला व्यक्तिशः ओळखावे अशी त्याची इच्छा आहे. लवकरच मी तुम्हांला गोष्ट सांगणार आहे, पण त्यापूर्वी तुम्ही प्रत्येकजण एकएक जोडीदार शोधा आणि तुम्ही लहान असताना तुमच्यावर कशी प्रीती केली गेली नाही, किंवा आनंदाचे तुमचे स्वागत केले गेले नाही त्याविषयी एकमेकांना सांगा.

**येशू मुलांना आशीर्वाद देतो याविषयी पवित्र शास्त्रातील गोष्ट**

**सुरुवातः** प्रशिक्षणार्थ्यांच्या जोड्या करा, आणि लहान असताना त्यांच्यावर कशी प्रीती केली गेली नाही, किंवा त्यांचे स्वागत केले गेले नाही त्याविषयी एकमेकांना सांगायला सांगा.

गोष्ट सांगितली जात असताना ऐकणाऱ्यांनी आपण त्या गोष्टीच्या ठिकाणी आहोत अशी कल्पना कशी करावी याविषयी त्यांनी समजून घ्यावे म्हणून प्रशिक्षणार्थ्यांसाठी **मार्गदर्शनपर सूचना** (पृ.37) त्यांना सांगा. ते कोणाला आणि काय पाहतात? जे काही घडत आहे त्याला गोष्टीतील लोक कसा प्रतिसाद देत आहेत? त्यांना कसला वास येत आहे का? त्यांना काही जाणवते का? तसेच प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यासाठी तुमची इच्छा. (तुमच्याकडे हिरा असेल, तर सदर गोष्ट प्रत्यक्ष आपल्या डोळयांसमोर घडत आहे असा अद्वितीय दृष्टीकोन प्रत्येकाकडे आहे हे स्पष्ट करण्यासाठी तुम्ही त्याचा वापर करू शकता). आपापले दृष्टीकोन सांगत असताना आपण एकमेकांपासून शिकणार आहोत. आपण आजच्याच गोष्टीवर लक्ष केंद्रित करू, आणि पवित्र शास्त्रातील आपल्याला माहीत असलेल्या इतर गोष्टी मध्ये आणू नयेत. आता ह्या क्षणी तुम्ही केवळ ऐका आणि कल्पना करा – तुम्ही तुमच्या पवित्र शास्त्रात पाहण्याची गरज नाही. तुम्ही जर पवित्र शास्त्र आणले असेल, तर ते बंद करून ठेवा.

**प्रस्तावनाः** येशू सर्व लोकांशी – तरुण आणि म्हातारे – संवाद साधत असल्याचे आपल्याला पाहायला मिळेल. लोकांना खूप आवडणाऱ्या, तसेच अजिबात न आवडणाऱ्या लोकांना तो भेटतो. येशूने त्याचे अनुसरण करण्यासाठी 12 जणांची निवड केली. त्यांना त्याचे शिष्य म्हटले जाई. त्याच्यासारखे जीवन जगण्याचा ते प्रयत्न करत होते. ही गोष्ट ऐका आणि येशू व त्याचे शिष्य एका विशिष्ट लोकगटाशी कसे बोलत आहेत ते ऐका. ही गोष्ट पवित्र शास्त्रात आहे म्हणून ती खरी आहे हे आपल्याला माहीत आहे. (आता तुम्ही गोष्ट सांगत असताना तुमचे पवित्र शास्त्र बंद करून बाजूला ठेवा.)

**गोष्ट सांगणेः मार्क. 10:13–16**

येशूने आपल्या मुलांना स्पर्श करून आशीर्वाद द्यावा म्हणून एके दिवशी आईवडिलांनी त्यांना येशूकडे आणले. पण पालक येशूला त्रास देतात म्हणून शिष्य त्यांच्यावर रागावले.

जे काही घडत होते ते येशूने पाहिले, तेव्हा त्याला त्याच्या शिष्यांचा राग आला. "बालकांना माझ्याकडे येऊ द्या. त्यांना अडवू नका! कारण स्वर्गाचे राज्य त्यांच्यासारख्यांचेच आहे. मी तुम्हांला सत्य सांगतो की, जो कोणी लहान मुलांप्रमाणे राज्याचा स्वीकार करत नाही, तो कधीही राज्यात प्रवेश करू शकणार नाही." मग त्याने मुलांना आपल्या बाहुपाशात घेतले, आपले हात त्यांच्या डोक्यांवर ठेवून त्यांना आशीर्वाद दिला.

**पुन्हा सांगणेः** गोष्ट पुन्हा सांगण्यासाठी किड्स स्टोरीबोर्डचा उपयोग करा किंवा एखादा खेळ खेळा.

**शोध प्रश्नः**

- गोष्ट सांगितली जात असताना तुमच्या लक्षात काय आले? तुमच्यामध्य कोणत्या भावना निर्माण झाल्या?
- गोष्टीमधील तुम्हांला काय आवडले?
- तुम्ही गोष्टीतील मुले पाहू शकता का? त्यांच्या चेहऱ्यावर कोणते हावभाव आहेत? शिष्यांविषयी त्यांना काय वाटले असावे असे तुम्हांला वाटते? येशूविषयी?
- आपल्या मुलांना येशूकडे आणण्याद्वारे पालकांना येशूकडून काय हवे होते?
- पालकांनी कोणते निर्णय घेतले? शिष्यांनी? येशूने? मुलांनी? त्यांनी इतर कोणत्या निवडी केल्या असत्या?
- ही गोष्ट आपल्याला देवाविषयी/येशूविषयी काय सांगते?
- तुमच्या समाजातील इतर लोक कोणत्या प्रकारे मुलांशी शिष्यांप्रमाणे वागतात? मंडळी त्यांच्याशी या प्रकारे कशी वागते?
- आपल्या मंडळ्या मुलांना येशूकडे येण्यापासून कशा रोखतात?
- मुलांना येशूकडे येण्यापासून मी कसा रोखतो?

**प्रतिसाद प्रश्नः**

- मुलांसंबंधी देवाच्या दृष्टीकोनाविषयी ही गोष्ट तुम्हांला काय सांगते?
- आज तुम्ही जे ऐकले आणि पाहिले त्यामुळे देव तुम्हांला काय म्हणत आहे?
- आजची गोष्ट आणि आपली चर्चा यांवरून तुम्ही जे शिकला त्यावरून पवित्र आत्मा तुमच्याकडे कशाची मागणी करत असल्याची जाणीव तुम्हांला होत आहे?

# सत्र #2
# पवित्र शास्त्रातील गोष्ट सांगणे/शिकणे म्हणजे काय

**गोष्ट सांगून पाठ शिकवणे आणि संडेस्कूलचा ठोकळेबाज वर्ग यांमध्ये प्रशिक्षणार्थ्यांना कोणकोणते फरक आढळले हे त्यांना सांगायला सांगून सत्राची सुरुवात करा.**

**पवित्र शास्त्रातील गोष्टी सांगणे म्हणजे काय?**

बायबलमधील गोष्ट सांगणे हे केवळ गोष्ट सांगण्यापेक्षा निराळे आहे. बायबलमधील गोष्ट सांगणे म्हणजे, ऐकणाऱ्या लोकांना देवाची प्रत्यक्ष ओळख व्हावी, त्याला अनुसरणे म्हणजे हे त्यांनी शिकावे, आणि ती गोष्ट पुनःपुन्हा सांगण्यासाठी देवाचे वचन शिकावे म्हणून लोकांची अंतःकरण तयार होतील असे शिक्षणाचे वातावरण तयार करणे. किड्स्टोरी हे मुलांना सुवार्ता सांगून त्यांना येशू ख्रिस्ताकडे आणण्याची (अनुभव आणि संवाद यांची सांगड घालून येशूची गोष्ट सांगण्याद्वारे देव आणि त्याचे मार्ग समजून घेणे) इच्छा असणाऱ्या तुमच्यासारख्या लोकांना दिले जाणारे प्रशिक्षण आहे.

**सार्वत्रिक किंवा वैश्विक सत्ये**

ह्या जगात तुम्ही कोठेही गेला, तरी काही गोष्टी जगात सर्वत्र एकसारख्याच असतात. तुम्ही कोणत्याही संस्कृतीत गेला तरी सर्व वयाच्या लोकांना एकसारख्या लागू होणाऱ्या गोष्टी तेथे असतात. आपण मुलांना देवाचे वचन शिकवत असताना ही ह्या गोष्टी कशा महत्त्वाच्या ठरतात हे आपण पाहू. त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश आहेः

- **कुटुंब/घनिष्ट नातेसंबंध**
- **संगीत**
- **खेळ/करमणूक**
- **कला (कलात्मक, नाटक, नृत्य)**
- **गोष्टी**

आपल्याला आपल्या गोष्टीमध्ये सौंदर्य आणायचे आहे, पण आपल्या गोष्टीत जर देव नसेल, तर ती तुमच्यासाठी फार छोटी होईल. आणि आपल्या छोट्याशा गोष्टीत सामावण्याइतपत देवाला लहान व्हायला सांगणे हे तुमच्या आणि देवाच्या वेळेचा अपव्यय आहे. पण जर तुम्ही देवाच्या गोष्टीत शिरला – जेथे दुःखातून नेहमी सौंदर्य बाहेर पडते अशा महान गोष्टीत प्रवेश कराल. अर्विन मॅक्मॅनस

**पाठाची रूपरेषा**

एखादा विशिष्ट, नमुनेदार पाठ कसा दिसतो? येशू मुलांना आशीर्वाद देतो ही गोष्ट आपण कशी सांगितली ह्याविषयी आपण थोडा विचार करू.

- **सुरुवातः** लोकांनी एकमेकांना आपल्या **वैयक्तिक गोष्टी सांगण्याची** ही वेळ आहे. त्यासाठी गोष्टीशी प्रत्यक्ष संबंधित नसलेली एखादी कृती किंवा एखादा प्रश्न असू शकेल, पण त्यामुळे लोक त्या दिशेकडे वळतील. मी तुम्हांला तुमच्या शेजारच्या व्यक्तीकडे वळून तुम्ही लहान असताना तुमच्यावर कशी प्रीती केली गेली नाही, किंवा तुमच्यावर माया केली नाही याचे अनुभव एकमेकांना सांगायला सांगितले. मग...
- **प्रस्तावनाः** हे प्रत्येकाला **देवाची गोष्ट ऐकायला तयार करणे** आहे. गोष्ट ऐकण्यासाठी लोकांना तयार करण्यासाठी तुम्ही एखादे वाक्य किंवा विधान तयार केले आहे का? त्यांना गोष्ट चांगली समजावी किंवा याअगोदरच्या गोष्टीकडून या गोष्टीकडे वळण्यासाठी उपयुक्त ठरेल अशी काही माहिती तुमच्याकडे आहे का? आज सकाळच्या गोष्टीमध्ये, येशू आणि त्याचे शिष्य एका ठराविक लोकगटाशी कसे वागले हे लक्षात घ्यायला/ऐकायला मी तुम्हांला सांगितले होते. आता ही वेळ...

**सुरुवात आणि प्रस्तावना यांतील फरक समजून घेणे जर गटाला कठीण जात असेल, तर पृष्ठ 10 वरील अभ्यास पाहा. पुढील विधान वाचल्यानंतर ते काय आहे हे त्यांना सांगता आले पाहिजे.**

- **गोष्ट सांगणेः** गोष्ट पवित्र शास्त्रातील असून ती खरी आहे हे लोकांना सांगणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ह्या वेळी लोकांची पवित्र शास्त्रे बंद असावीत, आणि त्यांचे लक्ष गोष्टीवर आणि गोष्ट सांगणाऱ्यावर केंद्रित असले पाहिजे. मग आपण पुन्हा ती गोष्ट सांगितली पाहिजे.

- **पुन्हा सांगणेः** कोणतेही स्पष्टीकरण आणि पवित्र शास्त्राची अचूकता यांसाठी लोकांनी आता गोष्ट पुन्हा सांगणे महत्त्वाचे आहे. त्यासाठीच एक मार्ग म्हणजे प्रशिक्षणार्थ्यांना त्यांची पवित्र शास्त्रे उघडून संबंधित शास्त्रभाग पुन्हा वाचायला सांगणे. कोणीतरी ती गोष्ट वाचू शकतो किंवा पुढारी योग्य क्रमवाचक प्रश्न विचारतो आणि प्रत्येकजण पवित्र शास्त्रात पाहून त्याची उत्तरे देऊ शकतात तसेच प्रशिक्षणार्थ्याला किंवा संपूर्ण गटाला गुंतवून ठेवण्यासाठी तुम्ही काही उपक्रमही राबवू शकता. येशू मुलांना आशीर्वाद देतो ही गोष्ट पुन्हा सांगताना आपण फ्लॅनेल बोर्डचा वापर केला. त्याऐवजी तुम्ही एखादा खेळ, एखादे गीत किंवा एखादी कलात्मक कृती यांचा उपयोग करू शकता. आपण एकत्र अभ्यास करत असताना यांपैकी गोष्टी तुम्हांला पाहायला मिळतील.

- **शोध आणि प्रतिसाद प्रश्नः** प्रश्न विचारणे आणि गोष्टीबद्दल बोलता येणे हे शिकण्याच्या प्रक्रियेत फार महत्त्वाचे आहे. एखाद्या गोष्टीमधील लोकांच्या भावना, त्यांचे हावभाव इ. शिवाय केवळ वस्तुस्थिती सांगून गोष्ट सांगण्याद्वारे शिकवण्याची आपल्याला सवय आहे. पुढारी, गोष्टींपैकी काही वास्तविकतांचे स्मरण करून देव आता तुमच्या जीवनात आणि अंतःकरणात काय करत आहे याकडे लोकांचे लक्ष वेधवू शकतो. त्याला प्रतिसाद म्हणून तुमच्या गटातील प्रत्येक व्यक्तीशी पवित्र आत्म्याने बोलावे म्हणून तुम्ही प्रार्थना करत आहात यासंबंधी एक किंवा दोन प्रश्न विचारावेत. बहुतांश अभ्यासक्रमांत गोष्टीच्या एखाद्या लागूकरणावर लक्ष केंद्रित केले जाते. पण गोष्ट सांगण्यामध्ये तसे नाही. हे लागूकरण तुमच्यासाठी आहे असे पवित्र आत्म्याने गटातील प्रत्येक व्यक्तीला सांगावे अशी आमची इच्छा आहे. तुमच्या गटातील लोकांकडून अनेक प्रकारचे प्रतिसाद मिळतील यात नवल नाही. ते चांगले आहे. देवाने प्रत्येक व्यक्तीला जे सांगितले त्याचे पालन करण्याबाबत त्यांची कशी प्रगती चालू आहे हे पाहण्यासाठी आगामी आठवड्यांत अनुधावन (फॉलो–अप) करता येईल.

## सुरुवात आणि प्रस्तावना यांच्या विधानांतील फरक

खाली दिलेली विधाने प्रशिक्षणार्थ्यांना सहजगत्या वाचायला सांगा आणि ती सुरुवातीची विधाने आहेत की, प्रस्तावनेची विधाने आहेत हे सांगायला सांगा.

| सुरुवात | प्रस्तावना |
|---|---|
| • तुम्ही कधी हरवला होता का? | • यहूदी लोकांना शोमरोनी लोक आवडत नव्हते. |
| • तुम्हांला मदत करावी म्हणून तुम्ही कधी कोणावर विश्वास ठेवला होता का? | • दाखला म्हणजे लोकांना एखादे सत्य शिकवण्यासाठी येशूने सांगितलेली गोष्ट. |
| • अशी कोणती गोष्ट आहे, जी हरवल्यानंतर तुम्हांला खऱ्या अर्थाने वाईट वाटेल? | • कुष्ठरोग आता बरा होऊ शकतो. पण येशू पृथ्वीवर होता, तेव्हा मात्र कुष्ठरोग्या संपर्कात आल्यावर आपल्यालाही तो आजार होईल अशी भीती लोकांना वाटत असे. ज्या व्यक्तीला कुष्ठरोग असेल तिला सर्व लोकांपासून दूर राहावे लागे. |
| • तुम्ही खऱ्या अर्थाने जेव्हा घाबरला होता अशा एखाद्या प्रसंगाविषयी आम्हांला सांगा. | • येशूने 5000 लोकांना जेवू घातले ही गोष्ट सांगण्याच्या अगोदर |
| • जगात तुम्हांला कोठेही जाता आले, तर तुम्ही कोठे जाल? | |

**फरक काय आहे:**

पवित्र शास्त्रानुसार कथा सांगण्याची सुरुवात पवित्र शास्त्राने होते, आणि पवित्र आत्म्याला शिक्षक होऊ देते. पुढाऱ्याची भूमिका ही पवित्र शास्त्र शिक्षक होणे नाही, तर सुलभीकरण करणारा होणे आहे. ह्याचा अर्थ काय? आपण...

- **अनुभव आणि स्पष्टीकरण यांतील फरक शोधू:** पुढारी प्रशिक्षणार्थ्यांना पवित्र शास्त्रात आणि गोष्टीत शिरू देतो. तो त्या शास्त्रभागाचा अर्थ सांगत नाही, किंवा त्यातून आपल्याला काय शिकायला मिळते हे सांगत नाही.
- **सुलभीकरण करणे विरुद्ध शिकवणे:** छोट्या गटांच्या पुढाऱ्यांसाठी हे समजून घेणे फार कठीण आहे. चर्चा करण्यासाठी आणि प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी सर्व गोष्टींची उजळणी केली जाते.
- **ऐकणे विरुद्ध बोलणे:** पुढारी ह्या नात्याने, तुम्ही पवित्र आत्म्याचे आणि प्रशिक्षणार्थ्यांचे म्हणणे ऐकण्याच्या स्थितीत असता. उत्तरे देण्याची तुम्हांला घाई नसते.
- **गोष्ट विरुद्ध उपदेश:** गोष्टीमध्ये परस्पर संवाद असतो, तर संदेश किंवा उपदेशामध्ये केवळ एकच व्यक्ती बोलत असते.

**पवित्र शास्त्रातील गोष्टींचे कथन का?**

मग मुलांना शिकवण्यासाठी आपण गोष्ट सांगण्याचा उपयोग का करतो?

- जगातील 2/3 पेक्षा जास्त लोक वाचू शकत नाहीत. ते गोष्टींद्वारेच शिकू शकतात.
- येशूने नेहमी गोष्टी/दाखल्यांद्वारे शिकवले (मत्तय.13:34)
- पवित्र शास्त्रातील 75% पेक्षा अधिक भाग गोष्टीरूपात लिहिला आहे.
- माझ्या शब्दापेक्षा देवाचे शब्द अधिक शक्तीशाली आहेत.
- देवाचे वचन पवित्र आत्म्याद्वारे लोकांची जीवने बदलते.
- जगात सर्व लोकांना गोष्टी आवडतात. तुम्ही कोणालाही कोठेही गोष्ट सांगू शकता.
- लोकांना देवाचे वचन समजते, आणि त्याच्यासोबत त्यांची घनिष्ट सहभागिता निर्माण होते.
- ज्या व्यक्तीला देवाची गोष्ट माहीत नाही त्याला मुले गोष्ट पुन्हा सांगू शकतात.

**येशू आणि पेत्र पाण्यावर चालले ती गोष्ट (मत्तय. 14:22–33)**

चला, आपण पाठाची एकत्र तयारी करू या: **प्रशिक्षणार्थ्यांची 3–4 जणांच्या गटात विभागणी करा. येशू आणि पेत्र पाण्यावरून चालले ही मत्तय.14:22–33. मध्ये सांगितलेली गोष्ट त्यांना वाचायला सांगा. त्यांची गटवार विभागणी करण्याअगोदर तुम्हांला हवे तर तुम्ही गोष्ट सांगू शकता.**

**गोष्ट सांगून झाल्यावर त्यांना सुरुवात आणि प्रस्तावना करू द्या.**

# गोष्ट शिकणे

आता ही गोष्ट शिकण्याची वेळ आहे. ह्या गोष्टीतील केवळ वास्तविकता लक्षात ठेवायच्या नाहीत, तर ती सांगायची आहे हे लक्षात ठेवा. तुम्ही घरी परत जाल, आणि येथील अनुभवाविषयी लोकांना सांगाल तेव्हा तुम्हांला जे जे सांगायचे आहे ते तुम्ही लक्षात ठेवत आहात का? नाही! ज्या घटनांचा आणि लोकांचा तुमच्यावर प्रभाव पडला त्यांची तुम्ही आठवण ठेवत आहात. देवाच्या गोष्टीबाबत हे निराळे का आहे? आपल्या श्रोत्यांना ह्या गोष्टी आपल्याला उत्सुकतेने आणि हावभावासहित सांगायच्या आहेत. मुलांनी केवळ देव कोण आहे आणि तो कसे कार्य करतो एवढेच लक्षात ठेवू नये, तर त्यांना इतरांनाही ती गोष्ट सांगता यावी अशी आपली इच्छा आहे.

प्रथम आपण तयारी करण्याची आवश्यकता आहे...

### तुमची अंतःकरणे तयार करा

तुमचे अंतःकरण पवित्र आत्म्याची वाणी ऐकून तिला प्रतिसाद द्यायला तयार आहे का? जर नसेल, तर तसे कसे करता येईल?

- **प्रार्थना**ः तुम्ही देवाशी बोलता, तसे तुम्ही त्याला तुमच्याशी बोलू देता का?
- **गोष्ट वाचणे:** ती गोष्ट तुम्हांला पुष्कळ वेळा आणि शक्य असेल तर निरनिराळ्या भाषांतरांतून वाचावी असे वाटेल. देव तुम्हांला काय प्रगट करत आहे? गोष्टीतील कोणाशी तुमचे साधर्म्य आहे? तुम्ही तुमचे अंतःकरण तयार करत असताना पवित्र आत्मा तुम्हांला ह्या गोष्टी दाखवत आहे हे लक्षात ठेवा. तुम्ही ज्या लोकांना गोष्ट सांगत आहात त्या गटात पवित्र आत्मा कदाचित वेगळ्याच प्रकारे बोलेल.
- **दृष्टीकोन**ः जो शास्त्रभाग शिकवायचा आहो त्यावर विचार करा. पवित्र आत्मा तुम्हांला काय प्रगट करत आहे? प्रशिक्षणार्थ्यांनी काय ऐकायची आणि शिकायची गरज आहे? तुम्ही तेथे आहात अशी कल्पना करा – तुम्हाला काय दिसते, कसला वास येतो, काय ऐकायला येते – तेथे असणे कशासारखे वाटते? ह्या गोष्टीतील वेगवेगळी पात्रे कोणती आहेत आणि संबंधित परिस्थितीविषयी त्यांचे दृष्टीकोन काय आहेत? देवाचा दृष्टीकोन काय आहे? कोण? काय? कधी? कोठे? का? कसे? यांसारख्या प्रश्नांची उत्तरे द्या. तुम्ही प्रत्यक्ष तेथे उपस्थित आहात असे समजून तिसरीच व्यक्ती गोष्ट सांगत असल्याप्रमाणे गोष्ट सांगा.

**गोष्टीचे विभाग पाडा**

गोष्ट लक्षात ठेवण्यासाठी तुम्हांला मदत होईल असे कोणकोणते मार्ग आहेत? गोष्टीची 4 किंवा जास्तीत जास्त 5 भागातध्दृश्यात विभागणी करणे सर्वातं चांगले आहे. प्रत्येक चित्र किंवा परिस्थिती तुम्ही नजरेसमोर आणता तेव्हा त्यातील तपशील तुम्ही भरू शकता.


पवित्र शास्त्रात गोष्ट जशी आहे तशी सांगणे **अतिशय महत्त्वाचे** आहे. ती पवित्र शास्त्रानुसार अगदी अचूक असली पाहिजे. ह्याचा अर्थ असा की, संबंधित गोष्टीत आपण आपले स्वतःचे शब्द किंवा अर्थविवरण घुसवू नये. श्रोत्यांचे लक्ष गोष्टीवर खिळून राहावे म्हणून ती आठवणीत ठेवता येण्यासारखी करा, पण तसे करत असताना आपल्या शब्दांची भर न घालता केवळ देवाच्याच शब्दांचा उपयोग करा. सरतेशवटी, प्रत्येकाने ही गोष्ट अतिशय चांगल्या प्रकारे शिकावी, जेणेकरून त्यांना दुसऱ्या कोणाला तरी ती सांगता येईल असे आमचे म्हणणे आहे.

गोष्ट शिकण्याच्या काही पद्धती पुढे दिल्या आहेत. गोष्ट शिकण्याची योग्य किंवा चुकीची पद्धत नाही. तुमच्यासाठी सर्वोत्कृष्ट ठरणारी पद्धत तुम्ही शोधण्याची गरज आहे.

- **वाचणे आणि सांगणेः** तुमची गोष्ट वाचा, तुमचे पवित्र शास्त्र बंद करा आणि तुमची गोष्ट मोठ्याने सांगा. तुम्ही किती अचूकपणे गोष्ट सांगितली हे पाहण्यासाठी पवित्र शास्त्रातून गोष्ट वाचा. असे अनेक वेळा करा.
- **घटनांची यादी करा**
- **मनचे नकाशे** (पृष्ठ 14)
- **गोष्टीचे रेखांकन** (पृष्ठ 15)
- **रूम लोकेशन्स (खोलीतील ठिकाणे):** पवित्र शास्त्रातील पात्रांच्या हालचाली किंवा इतर दृश्ये दाखवण्यासाठी खोलीमध्ये इकडेतिकडे फिरणे. तुम्ही एखादे दृश्य सांगत असताना तुम्ही स्वतः त्या दृश्यात (त्या ठिकाणी) उभे राहा.
- **हाताचे हावभावः** उदा. विश्वाच्या निर्मितीसंबंधी सांगताना तुमच्या हातांनी गोलाकार करून दाखवणे.
- **मुख्य किंवा महत्त्वाचे शब्दः** प्रत्येक विभाग किंवा दृश्यासाठी
- **दृश्यः** युट्यूब व्हिडिओज, फ्लॅनेल स्टोरीबोर्ड, मुलांची गोष्टींची पुस्तके, मासिके

हे केवळ गोष्टीतील शब्दांसंबंधी नाही. त्याऐवजी गोष्टीतील चित्रे तुमच्या मनात सजीव करून सांगा. ते फार प्रभावी होते!

एक प्रशिक्षक ह्या नात्याने, गोष्ट लक्षात ठेवण्यासाठी कोणते उपक्रम महत्त्वाचे आहेत ते तुम्ही ठरवाल. तुम्ही ज्यांना प्रशिक्षण देत आहात, त्यांच्यासाठी उपयुक्त ठरतील, आणि पुढे जाऊन ते ज्यांचे नेतृत्व करतील त्यांनाही ती उत्तेजन देऊ शकतील अशी साधने वापरण्यास मदत करणे महत्त्वाचे आहे. तसेच गोष्ट सांगण्यासाठी तुम्ही जी साधने वापरणार आहात ते पाहणेही महत्त्वाचे आहे, कारण त्यांपैकी काही साधने हाताळण्यास किंवा वापरण्यास सोपी असतील. प्रशिक्षणार्थ्यांसाठी काय उत्कृष्ट आहे हे त्यांना शोधू द्या. तसेच मुलांना तुम्ही गोष्ट पुन्हा कशी सांगायला सांगणार तेही महत्त्वाचे आहे. शिकण्याच्या निरनिराळ्या पद्धती वापरून मुलांचे लक्ष वेधून घेतले पाहिजे हे लक्षात ठेवा.


गोष्ट

# गोष्टीचे रेखांकन

पवित्र शास्त्रातील गोष्ट ______________________

पवित्र शास्त्र संदर्भ __________________________

| | | |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |

**गोष्टीला कलाकुसर करणे**

कलाकुसर करणे म्हणजे एखादी गोष्ट घेऊन तिला अधिक अर्थपूर्ण बनवणे. हे अतिशय काळजीपूर्वक आणि प्रत्येक बारीकसारीक तपशील लक्षात घेऊन करावे लागते. पवित्र शास्त्रातील एखादी गोष्ट आपण अशा प्रकारे तयार करतो तेव्हा शास्त्रवचने केवळ पाठ केली जातात असे नाही, तर पुढील गोष्टींचा विचार करून गोष्ट सांगितली जातेः

- **गृहीत धरलेले ज्ञानः** पवित्र शास्त्राच्या लेखकांनी, पवित्र शास्त्र वाचणाऱ्यांना किंवा ऐकणाऱ्यांना ते ज्या संस्कृतीत राहतात तिचे ज्ञान आहे हे जाणून ते लिहिले आहे. उदा. शोमरोन्यांविषयी यहूद्यांना न आवडणाऱ्या सर्व गोष्टी चांगल्या शोमरोन्याच्या दृष्टान्तात होत्या. त्यांना त्या माहीत होत्या, पण आपल्याला माहीत नाहीत. ही माहिती प्रस्तावनेत सांगितली पाहिजे. शक्य असेल तर ह्या विधानाची पुष्टी करण्यासाठी पवित्र शास्त्रातील इतर संदर्भ वापरावेत.

- **वयाला अनुरूपः** स्पष्टीकरण केल्याशिवाय मुलांना समजणार नाहीत, असे काही शब्द गोष्टीमध्ये आहेत का? त्याऐवजी मुलांना समजेल असा पर्यायी शब्द वापरणे उचित ठरेल, पण तसे करताना गोष्ट पवित्र शास्त्रानुसार अचूक ठेवावी, किंवा प्रस्तावनेमध्ये तसे स्पष्ट करावे.

- **कशाची गरज पडणार नाहीः** काही तपशीलामुळे गोष्ट फसते आणि काय जाणून घेणे महत्त्वाचे आहे हेच लोकांना समजत नाही. उदा. लक्षात ठेवायला कठीण नसणारी गोष्टीतील नावे, आकडे आणि ठिकाणे, पण त्यामुळे प्रशिक्षणार्थ्यांचे लक्ष विचलित होते.

- **सुरुवातीची आणि समाप्तीची विधानेः** कोणत्या माहितीची अधिक गरज आहेय यापूर्वीच्या गोष्टीतून संक्रमण (अवस्थांतर) करण्याची गरज आहे का?

- **सांस्कृतिक गुन्हे (प्रमाद)ः** प्रशिक्षणार्थ्यांच्या भावना दुखावणार नाहीत अशा बाबी गोष्टीत नसाव्यात याची खबरदारी घ्या (विहिरीवर येशू एकटाच स्त्रीशी बोलत होता.)

**प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिशः गोष्ट शिकण्यासाठी 10 मिनिटांचा वेळ द्या. त्यांची दोघा–दोघांमध्ये किंवा लहान गटांमध्ये विभागणी करा, म्हणजे प्रत्येकाला गोष्ट सांगण्याची संधी मिळेल. गोष्ट शब्दशः अचूक सांगणे महत्त्वाचे नाही, तर ती सांगताना मिळणारा आनंद महत्त्वाचा आहे यावर जोर द्या.**

# सत्र #3
# गोष्ट सांगणे

**देवाची शैली**

गोष्ट अधिक सजीव व्हावी, आणि मुलांना पवित्र शास्त्रातील गोष्टीत अधिक रस निर्माण व्हावा म्हणून आपण गोष्ट सांगण्यामध्ये काही भर घालू या. आपण पवित्र शास्त्राचीच शब्दयोजना वापरणार आहोत, त्यात आपल्या मनचे काहीही घालणार नाही हे लक्षात ठेवा. देवाने त्याच्या गोष्टी कशा सांगितल्या त्याची काही तत्त्वे आपण प्रथम पाहू. त्याने त्या अतिशय...

- **संस्मरणीय केल्याः** देव त्याचा संदेश अशा पद्धतींनी सांगतो की, आपण तो विसरू शकत नाहीय त्या पद्धती आपल्याला गोष्टीची अनुभूती देतात. काही उदाहरणे अशी आहेत रू जलप्रलयानंतर देवाने आकाशात ठेवलेले मेघधनुष्या आणि येशूच्या हातातील जखमांमध्ये बोट घालून त्या चाचपणारा थोमा.

- **अनपेक्षित केल्याः** कधीकधी संदेश अनपेक्षित प्रकारे येतो. काही उदाहरणे अशी रू बलाम आणि त्याची गाढवी, मोशे आणि जळते झुडूप, शौलाचे अंधळे होणे, पवित्र शास्त्रातील निरनिराळी आरोग्यदाने (नामान, लंगडी आणि आंधळी माणसे). आपली एकत्र येण्याची जागा, बसण्याची व्यवस्था, किंवा प्रकाश आणि अंधाराची व्यवस्था करून आपण आपल्या वर्गाचे पर्यावरण बदलू शकतो.

- **बहुविध संवेदनाः** देवाने त्याची गोष्ट संस्मरणीय करण्यासाठी संवेदनांचा वापर केलाय आपण जितक्या संवेदना आणि कृतींचा वापर करतो, तितके अधिक आपण लक्षात ठेवण्याची संभावना असते!

    - **दृश्य गोष्टीः** आपण पाहणारे लोक आहोत, म्हणून लोकांना गोष्ट दिसण्यास मदत होईल अशा गोष्टी वापरणे उचित ठरेल.

        - **उद्दिष्टः**

**प्रत्येक गटाला वेगवेगळे कापड द्या, आणि येशू व पेत्र पाण्यावर चालले ही गोष्ट सांगण्यासाठी त्याचा कसा वापर करता येईल हे ठरवायला सांगा.**

        - **किड्स स्टोरीबोर्ड्सः** (ह्याविषयी आपण नंतर अधिक बोलणार आहोत)

        - **वेशभूषा**

- **स्पर्श:** उदाहरणे रू हातात धरून ठेवायच्या किंवा पुढच्या व्यक्तीकडे द्यायच्या गोष्टी, मुलांवर पाणी उडवणे.

- **ऐकणे:** उदाहरणे रू साउंड इफेक्ट, पावसाचा आवाज काढण्यासाठी हात एकमेकांवर घासणे.

- **गंध (वास):** उदाहरणे रू धूप जाळणे, दाखवण्यासाठी तसेच वासासाठी मासा.

- **चव:** उदाहरणे रू चव घेण्यासाठी अन्न (मान्ना)

- **करून दाखवणे:** येशू त्याच्या शिष्यांबरोबर राहिला – त्याने त्यांना केवळ शिक्षण दिले असे नाही, तर त्यांच्यासमोर आदर्श किंवा नमुनादेखील ठेवला. त्याने स्वतःला उंच केले नाही, तर त्यांची सेवा केली. आपणही तसे कसे करू शकतो? पुष्कळ वेळा केवळ आपल्या कृती आणि आपले दृष्टीकोन यांवरून येशू कोण आहे आणि पवित्र शास्त्रातील गोष्टींमध्ये त्याने लोकांना कसा प्रतिसाद दिला हे मुलांना समजू शकते.

**सर्वजणांची लहान लहान गटांत विभागणी केल्यावर, पवित्र शास्त्रातील निरनिराळ्या संवेदनाची अनुभूती देणाऱ्या कोणकोणत्या गोष्टी त्यांना आठवतात ते सांगण्यासाठी त्यांना 3 मिनिटे वेळ द्या.**

**गोष्ट सांगण्याच्या निरनिराळ्या पद्धती**

- **प्रथम पुरुषी:** तुम्ही स्वतःच त्या गोष्टीतील एक पात्र आहात असे समजणे.
- **तृतीय पुरुषी:** गोष्ट सांगणारा ह्या नात्याने
- **कला:** कागद, क्रेयॉन्स, मार्कर्स
- **वस्तू:** कपडे, स्प्रे बॉटल
- **नाटक**
- **हाताचे हावभाव**
- **श्रोत्यांचा सहभाग**
- **कोणीतरी एकाने गोष्ट वाचत असताना दुसऱ्या व्यक्तीने त्यानुसार कृती करणे**

## सादरीकरण

- **हालचाल:** खुर्चीवर चिकटून बसू नका. गोष्टीमध्ये जर एका ठिकाणाहून दुसरीकडे जाणे असेल, तर तुम्हीही इकडून तिकडे जाणे योग्य ठरेल.

- **हावभाव:** तुमच्या चेहऱ्यावरील हावभावामुळे गोष्ट विश्वसनीय होते. तुमचा चेहरा जर बोलका असेल तर तुम्हांला जास्त बोलायची गरज पडत नाही. **प्रशिक्षणार्थ्यांना एकमेकांकडे वळायला सांगा. यापुढच्या पानावर दिलेला हावभावाचा तक्ता घेऊन एका व्यक्तीने त्यातील पाच हावभाव निवडावेत, व समोरच्या व्यक्तीने त्यानुसार हावभाव करावेत. मग दुसऱ्या व्यक्तीलाही तसेच करायला सांगा. व्यक्तीच्या चेहऱ्यावरील हावभावातील फरकावरून त्याने नक्की कोणती भावना व्यक्त केली आहे हे समोरच्या व्यक्तीने ओळखावे.**


- **श्रोत्यांचा सहभाग:** गोष्ट सांगण्यामध्ये कधीकधी काही किंवा सर्व मुलांना सहभागी करून घेणे मनोरंजक असते. पुढील गोष्टींद्वारे हे साध्य करता येते
  - **प्रशिक्षणार्थी म्हणू शकतील किंवा प्रतिसाद देतील असे पुन्हा पुन्हा येणारे शब्द/म्हणी**
  - **हात आणि शरीराच्या हालचाली**
  - **साऊंड इफेक्ट**
  - **गीत**
  - **सक्रीय सहभाग:** संपूर्ण गोष्टीचे किंवा गोष्टीतील काही भागाचे नाट्यीकरण करणे


- **आवाज:** आवाजामुळे गोष्ट सजीव होते. वर्गात जास्त कंटाळा कशामुळे येतो – एकसुरी आवाज हे पहिल्या क्रमांकाचे उत्तर आहे. पुढील गोष्टींचे प्रात्यक्षिक दाखवा:
  - **उच्चार**
  - **आवाजाची फेक**
  - **विश्राम (थांबणे):** गोष्टीमध्ये आणि चर्चेमध्ये हे फार प्रभावी होऊ शकते. शांततेला घाबरू नका. शांततेमध्ये पवित्र आत्म्याला कार्य करता येते आणि त्यामुळे डोक्यातील गोष्ट अंतःकरणात शिरायला मदत होते.
  - **गती:** विद्यार्थ्यांना गोष्ट समजणे सोपे जाईल इतक्या वेगाने किंवा हळू बोला.


**जोड्याजोड्यांमध्ये किंवा लहान लहान गटांत विभागणी करा, आणि ह्या वेळी गोष्ट सांगण्याच्या तंत्रांचा उपयोग करून येशू आणि पेत्र पाण्यावरून चालले ही गोष्ट प्रत्येक व्यक्तीला सांगायला सांगा. आपल्या मनची काहीही भर न घालता, पवित्र शास्त्र जेवढे सांगते तेवढेच सांगणे फार महत्त्वाचे आहे.**


---

**मध्यंतरापूर्वी एका व्यक्तीला आणि मध्यंतरानंतर दुसऱ्या व्यक्तीला गोष्ट सांगायला सांगा**



आत्मविश्वासपूर्ण



गोंधळलेला



दोषी



आनंदी



निराश



दु:खी



आशादायी



थकलेला



खोडकर



घाबरलेला


रागीट


एकाकी


प्रेमात पडलेला


चिंताक्रांत


मत्सरी

# गृहपाठ स्वाध्याय

पुढच्या प्रशिक्षण सत्राच्या अगोदर हा स्वाध्याय करण्याची आवश्यकता आहे. लूक.15:1—7 मधून हरवलेल्या मेंढराची गोष्ट वाचा. ती गोष्ट पुष्कळदा, शक्यतो निरनिराळ्या भाषांतरांतून वाचावी. शक्य असेल, तर पुढच्या कार्यशाळेत येण्यापूर्वी ही गोष्ट दुसऱ्या कोणाला तरी सांगण्याचा प्रयत्न करावा.

## हरवलेल्या मेंढरांचा दाखला (गोष्ट) सांगणे (लूक. 15:1—7)

सर्व जकातदार व पापी त्याचे (येशचे) ऐकण्यास त्याच्याजवळ येत होते. तेव्हा परूशी व मोशेच्या नियमशास्त्राचे शिक्षक कुरकुर करू लागले की, "हा पाप्यांना जवळ करून त्यांच्याबरोबर जेवतो."

मग त्याने त्रांना हा दाखला सांगितलाः

"तुमच्यामध्ये असा कोण मनुष्य आहे की, त्याच्याजवळ शंभर मेंढरे असता त्यांतून एक हरवले तर नव्याण्णव रानात सोडून देऊन ते हरवलेले सापडेपर्यंत तो त्याचा शोध करत नाही? ते सापडल्यावर तो ते आनंदाने खांद्यांवर घेतोय आणि घरी येऊन मित्रांना व शेजाऱ्यांना एकत्र बोलावून त्यांना म्हणतो, माझे हरवलेले मेंढरू सापडले आहे म्हणून माझ्याबरोबर आनंद करा."

"त्याप्रमाणे ज्यांना पश्चात्तापाची गरज नाही अशा नव्याण्णव नीतिमानांबद्दल होणाऱ्या आनंदापेक्षा पश्चात्ताप करणाऱ्या एका पापी माणसाबद्दल स्वर्गात अधिक आनंद होईल, हे मी तुम्हांला सांगतो."

**गोष्ट सांगणेः** ही गोष्ट तुम्ही अधिक चांगल्या प्रकारे कशी लक्षात ठेवू शकाल? ही कथा अधिक रंजक होण्यासाठी आणि मुलांना तिच्यात रस निर्माण होण्यासाठी तुम्ही गोष्ट सांगण्याच्या कोणत्या पद्धतींची त्यात भर घालाल?

# सत्र #4
# मननः येशूच्या पद्धतीप्रमाणे करणे, मार्क 6:7—13

प्रशिक्षणार्थ्यांचे स्वागत करा आणि जर वेळ असेल, तर आदल्या दिवशी त्यांना आलेल अनुभव सांगायला सांगा. आजचा आपला दिवस सुरू करण्यापूर्वी मला तुम्हांला एक गोष्ट सांगायची आहे, आणि आपण त्याच्या नावाने सेवा करत असताना तो आपल्याकडून काय अपेक्षा करतो हे आपण समजून घ्यावे अशी माझी इच्छा आहे.

**सुरुवातः** (आपल्या सोबत्याकडे वळा आणि एकमेकांना सांगा)

देवाने तुम्हांला सामर्थ्याने वापरले ती वेळ

किंवा

तुम्हांला काहीतरी करायचे होते, पण ज्या साधनांची तुम्हांला गरज पडेल असे तुम्हांला वाटले ती तुमच्याकडे नव्हती म्हणून तुम्ही निराश झाला तो प्रसंग.

**प्रस्तावनाः**

येशू संपूर्ण देशभर शिक्षण देत आणि लोकांना बरे करीत फिरत होता. तो त्याच्या गावी म्हणजे नासरेथला आला. तो देवाचा पुत्र आहे यावर तेथल्या फार कमी लोकांचा विश्वास होता असे त्याला आढळले. त्यामुळे तेथे तो फारच थोडे आजार बरे करू शकला. मार्ककृत शुभवर्तमानातील आपल्या पवित्र शास्त्रीय गोष्टीची सुरुवात आपण येथून करणार आहोत.

**गोष्ट सांगणेः**

नंतर त्या बारा जणांना जवळ बोलावून तो त्यांना जोडीजोडीने पाठवू लागलाय त्याने त्यांना अशुद्ध आत्म्यांवरचा अधिकार दिला. आणि त्यांना आज्ञा केली की, वाटेसाठी काठीवाचून दुसरे काही घेऊ नकाय भाकरी, झोळणा, किंवा कमरकशात पैसे घेऊ नका. तरी वहाणा घालून चालाय दोन अंगरखे घालू नका.

आणखी तो त्यांना म्हणाला, तुम्ही कोठेही एखाद्याच्या घरी उतराल तेव्हा ते ठिकाण सोडीपर्यंत तेथेच राहा. आणि ज्या ठिकाणी तुमचे स्वागत होणार नाही व जेथील लोक तुमचे ऐकणार नाहीत, तेथून निघताना, त्यांना साक्ष व्हावी म्हणून आपल्या तळपायांची धूळ तेथेच झाडून टाका. (मी तुम्हांला खचीत सांगतो की, न्यायाच्या दिवशी त्या नगरापेक्षा सदोम व गमोरा ह्यांना सोपे जाईल.

ते तेथून निघाले व लोकांनी पश्चात्ताप करावा अशी त्यांनी घोषणा केली, पुष्कळ भुते काढली आणि अनेक रोग्यांना तैलाभ्यंग करून बरे केले.

**पुन्हा सांगणेः**

“वरुम” कृती करण्यासाठी दोरीध्तार वापरा म्हणज दोरी जेव्हा एका हातातून दुसऱ्या हातात पास केली जाईल, आणि थांबा म्हटल्याबरोबर ज्या व्यक्तीच्या हातात दोरी असेल, त्याने त्या गोष्टीचा पुढचा भाग सांगावा.

**शोध प्रश्नः**

- ह्या गोष्टीतील तुम्हांला काय आवडले?
- तुम्ही ह्यापूर्वी कधी ऐकले नाही असे ह्या गोष्टीत काही होते का?
- शिष्यांना काय घ्यायची परवानगी नव्हती?
- त्यांच्याकडे काय होते?
- ह्या गोष्टीमध्ये जे घडले त्यापैकी कशामुळे तुम्ही आश्चर्यचकित होता?
- देवाचे कार्य करण्यासाठी तुमच्याकडे काय हवे किंवा तुम्ही कशावर अवलंबून राहिले पाहिजे असे तुम्हांला वाटते?
- तुम्ही देवाची सेवा करावी अशी त्याची इच्छा आहे याची तुम्हांला या गोष्टीद्वारे कितपत खात्री पटते?

**प्रतिसाद प्रश्नः**

- तुम्ही ही गोष्ट ऐकल्यावर पवित्र आत्मा आता तुम्हांला काय म्हणत आहे?
- तुम्ही स्वतःवर नव्हे, तर देवावर अवलंबून राहिले पाहिजे असे या गोष्टीत कोठे सांगितले आहे?

# सत्र #5
# गोष्ट पुन्हा सांगणे

गोष्टीमध्ये आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी आणि पवित्र शास्त्रानुसार अचूकता आणण्यासाठी लोकांनी गोष्ट पुन्हा सांगणे महत्त्वाचे आहे. त्याची एक पद्धत म्हणजे प्रशिक्षणार्थ्यांकडे पवित्र शास्त्र असेल, तर त्यांना ते उघडायला सांगून ती गोष्ट पुन्हा वाचायला सांगणे. कोणीतरी एकाने पवित्र शास्त्रातून गोष्ट वाचावे किंवा पुढाऱ्याने यथाक्रम प्रश्न विचारावेत आणि प्रत्येकाने पवित्र शास्त्रात पाहून त्यांची उत्तरे द्यावीत. तसेच मुलांना गोष्टीत गुंतवून ठेवण्यासाठी ग्रुप अक्टिविटीजचाही समावेश करणे उपयुक्त ठरेल. त्यामुळे मुलांना गोष्ट लक्षात ठेवण्यास, आणि ती गोष्ट दुसऱ्या कोणाला तरी सांगण्यास मदत होते.

प्रत्येक संस्कृतीमध्ये कोणकोणती सार्वत्रिक सत्ये आढळतात हे कोणाला आठवते का? (आपुलकी, खेळ, संगीत, कला आणि गोष्टी) गोष्ट पुन्हा सांगताना आपण यांचा उपयोग करू शकतो. विशेषतः मुले जे करत आहेत त्यावर त्यांना लक्ष केंद्रित करण्यासाठी खेळ उपयुक्त आहेत. तुम्हांला कोठेही सहज सापडणाया गोष्टींनी आपण काही साधेसोपे खेळ खेळणार आहोत.

**पेत्र आणि येशू पाण्यावरून चालतात ही गोष्ट पुन्हा सांगताना गटामध्ये एका खेळाचा उपयोग करावा. मग प्रत्येक गटाला खाली दिलेली सार्वत्रिक सत्यांपैकी निरनिराळ्या सत्यांविषयी एखादी कृती करायला सांगा. वर्गाच्या शेवटी सर्व गटांना त्यांच्या कृतींचे प्रदर्शन दाखवण्यासाठी पुरेसा वेळ ठेवा.**

**खेळ**

- **बीच बॉलः** कोणत्याही बायबल कथेसाठी बीच बॉलवर ठराविक प्रश्न परमनन्ट मार्करने लिहावेत. मुलगा जेथे बॉल कॅच करील, तेथे त्याने त्या प्रश्नाचे उत्तर द्यावे. पृष्ठ 29 वर दिलेले प्रश्न तुम्ही वापरू शकता.
- **सर्कल टॉसः** एक चेंडू किंवा कोणती तरी नरम वस्तू वर फेकली जाते, आणि ज्या व्यक्तीने बॉल वर फेकला असेल त्याने पवित्र शास्त्र गोष्टीमध्ये पुढे काय घडले हे सांगावे. फुगा वापरणेसुद्धा फार मनोरंजक होईल.
- **वेळदर्शकः** एखादा गट दिलेल्या वेळेत किती गोष्ट सांगतो हे घड्याळाच्या किंवा अंडे उकडण्याच्या टाईमरद्वारे मोजा.
- **नॉट युः** 5 यार्ड दोरी घ्या, आणि तिची दोन्ही टोके बांधून वर्तुळाकार तयार करा. मुलांना दोरी धरायला सांगा. तुम्ही आज्ञा दिल्याबरोबर मुले दोरी घड्याळाच्या काट्याच्या दिशेने फिरवतात आणि जेव्हा तुम्ही “स्टॉप” (थांबा) म्हणता तेव्हा ज्या मुलाच्या हातात दोरीची गाठ असेल, त्याने पवित्र शास्त्रीय कथेसंबंधी तुम्ही विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर द्यावे किंवा त्या गोष्टीत पुढे काय झाले ते सांगावे.
- **स्टोरी कार्ड्सः** बायबल स्टोरीचे निरनिराळे भाग निरनिराळ्या कागदांवर लिहा. ते कागद वर्गातील निरनिराळ्या मुलांना द्या. ज्या मुलांना कागद मिळाले त्यांनी गोष्टीच्या क्रमानुसार उभे राहावे. तुम्ही त्यांना ठराविक वेळेत ओळीत उभे राहायला सांगू शकता किंवा गोष्टीच्या निरनिराळ्या भागाच्या दोन दोन प्रती तयार करा, आणि अनेक गटांना द्या. मुलांनी आपलाच गट प्रथम क्रमानुसार ओळीत उभा राहावा यासाठी प्रयत्न करावेत.
- **संगीत खुर्चीः** खुर्च्या वर्तुळाकार ठेवा. गटामध्ये जितकी मुले असतील त्यापेक्षा एक कमी खुर्ची ठेवा. संगीत वाजत असताना मुले खुर्च्यांभोवती फिरतात. संगीत थांबल्याबरोबर प्रत्येकजण खुर्चीवर बसण्याचा प्रयत्न करतो. ज्याला बसायला खुर्ची मिळत नाही त्याने गोष्टीचा पुढील भाग सांगावा. गोष्ट पूर्ण सांगून होईपर्यंत हा खेळ चालू ठेवा.
- **डाईस गेमः** प्रत्येक लहान गट वर्तुळाकार बसतो, त्यांना एकेक डाईस (फासा) दिला जातो. पहिला मुलगा फासा टाकतो. जर 2, 3, 4 किंवा 5 पडले तर गोष्टींत पहिल्यांदा कोणती गोष्ट घडली हे ते सांगतात. जर 1 पडला, तर तो मुलगा बाहेर पडतो आणि त्याच्यानंतरच्या मुलाने गोष्टीत काय घडले ते सांगावे. जर 6 पडले, तर उजवीकडच्या मुलाऐवजी डावीकडच्या मुलाने गोष्टीत काय घडले ते सांगावे. गोष्ट पूर्ण सांगून होईपर्यंत हे चालू ठेवा.

### कला

- **ग्राफिटी वॉलः** एक गट ह्या नात्याने मुलांनी गोष्ट सांगणारे शब्द लिहावेत किंवा चित्रे काढावीत.
- **वैयक्तिक ड्रॉइंगः** मुलांना गोष्टीचा जो भाग आवडतो त्याचे ते रंगीत चित्र काढतात.
- **टी शर्ट डिझाइनः** गोष्टीचे प्रमुख भाग स्पष्ट करील असे डिझाइन मुलांना टी शर्टवर काढायला सांगा.
- **पाईप क्लिनर्स आणि चिनी मातीः** गोष्ट पुन्हा सांगण्यासाठी यांचा किंवा इतर उपलब्ध साहित्याचा उपयोग करा.
- **बिलबोर्डः** पवित्र शास्त्राच्या कथेचा किंवा त्या गोष्टीशी तुम्ही कसे संबंधित आहात हे व्यक्त करणारा एक बिलबोर्ड; रस्त्याच्या कडेला लावतात तसा बनवा.
- **पिक्शनरीः** गोष्टीचे निरनिराळे भाग दिले जातात, आणि व्यक्तीने त्यानुसार चित्र काढावे. चित्र नक्की काय आहे ते इतरांनी ओळखेपर्यंत त्याने ते करावे.

### नाटक

- **भूमिका करणेः** गटामधील मुलांना गोष्टीतील निरनिराळ्या गोष्टींचा अभिनय करायला सांगणे. त्यांना त्याचा  सराव करू द्या, मग ऊर्वरित मुलांसमोर त्यांना ती नाटिका सादर करू द्या.
- **किड्स स्टोरीबोर्ड्सः** मुलांना गोष्ट पुन्हा सांगू द्या. त्यासाठी त्यांनी फ्लॅनेलमधील निरनिराळी पात्रे गोष्टीच्या आवश्यकतेनुसार फ्लॅनेलवर चिकटवावी.
- **मूकाभिनयः** शब्दांचा वापर न करता मुले गोष्टीतील दृश्ये सादर करतील. गोष्टीतील कोणते दृश्य ते सादर करत आहेत हे वर्गातील इतरांनी ओळखावे.
- **पवित्र शास्त्रकथा पुन्हा वाचणे** आणि गोष्टीतील जे शब्द किंवा कृती पुन्हा पुन्हा येतात त्यांच्यासाठी निरनिराळे साउंड इफेक्ट्स आणि हावभाव वापरावेत.
- **वस्तू** (उदा. स्कार्फ, दोरी): गोष्ट सांगण्यासाठी ते किती वेळा वस्तूंचा उपयोग करू शकतात ते पाहा. तुम्हीसुद्धा प्रत्येक गटाने गोष्ट सांगताना वापराव्यात म्हणून तीन निरनिराळ्या वस्तू  देऊ शकता.
- **हालचाल, हावभावः** गोष्टीचा प्रत्येक भाग व्यक्त करण्यासाठी निरनिराळ्या हालचालींचा उपयोग करा. तुम्ही प्रत्येक मुलाला एक कृती किंवा हावभाव करायला सांगू शकता, आणि गोष्टीत ज्या क्रमाने ती कृती किंवा हावभाव येईल त्या क्रमाने त्यांनी ती करावी.
- **मानवी स्लाइड शोः** पडदा म्हणून वापरण्यासाठी एक मोठे कापड घ्या. दोन मुलांनी ते हातात धरून उभे राहावे, आणि तुम्ही सांगाल तेव्हा त्यांनी ते खाली सोडावे. गोष्टीतील पात्रे म्हणून पुष्कळ मुलांची निवड करा. गोष्टीच्या प्रत्येक भागासाठी, पडदा वर धरलेला असताना, मुलांनी त्या गोष्टीतील पात्राचे चित्र किंवा पेंटिंग असल्याप्रमाणे उभे राहावे. त्यांनी एकदम शांत उभे राहावे, आणि जेव्हा पडदा खाली घेतला जाईल तेव्हा बाकीचे मुले ते पाहू शकतील. तुम्ही गोष्ट सांगत असताना प्रत्येक दृश्य बदलते.
- **कळसूत्री बाहुल्याः** गोष्ट पुन्हा सांगण्यासाठी मोजे, पेपर प्लेट्स, कागदाचे कप आणि काड्या यांचा उपयोग करून साध्यासुध्या बाहुल्या (पपेट्स) बनवा.

### संगीत

- **रॅप रिव्ह्यूः** मुलांना गोष्टीतील मुख्य घटना रॅपमध्ये सांगायला सांगा.
- **एखाद्या परिचित गीताचे नवीन शब्दः** मुलांना एखादे साधेसोपे गीत निवडू द्या. पवित्र शास्त्रकथा त्यांना त्या गीताद्वारे सांगता यावी ह्या दृष्टीने त्यांनी त्या गीताचे शब्द बदलावेत.
- **ऱ्हिदम (ताल)ः** मुलांनी एखादा ऱ्हिदम (ताल) निवडावा, आणि तुम्ही तो ऱ्हिदम वाजवत असताना त्यांनी त्या तालात गोष्ट सांगावी.
- **नाचः** नाचाद्वारे गोष्ट सांगता येईल असा नाच तयार करा. त्यासाठी पार्श्वसंगीताचा वापर करा.

### लिखाण

- **गोष्टीची पुस्तकेः** मुलाने चित्राद्वारे किंवा गोष्टीच्या पुस्तकातील (किंवा कॉमिकमधील) शब्दांच्या आधारे गोष्ट सांगावी.
- **रोजनिशीः** मुलांना शांत बसण्याची आणि गोष्टीत काय काय आहे, आणि त्यांच्यासाठी त्यांचा अर्थ काय हे लिहिण्याची संधी देणे.
- **टॉप टेन (अव्वल दहा)ः** प्रत्येक गटाला किंवा एकेका मुलाला गोष्टीतील महत्त्वाच्या 10 घटना लिहायला सांगा.
- **पुढे कायः** मुलांनी गोष्टीत जे ऐकले त्यावरून देव त्यांना काय करायला सांगत आहे हे प्रत्येक मुलाला लिहायला सांगा.
- **तुलनाः** सांगितलेल्या गोष्टीतील एकेक पात्र प्रत्येक मुलाला निवडायला सांगा. पवित्र शास्त्रातील त्या व्यक्तींशी त्यांचे कसे साम्य आहे किंवा त्यांच्यात काय फरक आहे हे सांगणारा त्यांना तक्ता तयार करायला सांगा.

# सत्र #6
# हरवलेले मेंढरू

हरवलेल्या मेंढराची गोष्ट प्रत्येकाने वाचली का? तुम्हांला ती गोष्ट इतरांना सांगता आली का? तुम्ही जर सांगितली असेल, तर काय घडले हे तुम्ही आम्हांला सांगू शकाल का?

ह्या सत्रामध्ये आपण हरवलेल्या मेंढराविषयीचा पाठ तयार करणे आणि सांगणे ही प्रक्रिया पुन्हा करणार आहोत. चला, आपण 3–4 जणांचे लहान लहान गट तयार करू.

तुमच्या गटात, तुमच्यासाठी आणि ज्या मुलांना तुम्ही गोष्ट सांगणार आहात त्यांच्यासाठी काही मिनिटे **प्रार्थना करा** (5 मिनिटे).

प्रत्येक गटातील दोन मुलांनी त्यांच्या पवित्र शास्त्रातून ही गोष्ट मोठ्याने **वाचावी.** (5 मिनिटे)

तुमच्या गटात, तुमचा पाठ **सुरू करण्यासाठी** सर्वांत चांगली कृती काय असेल, किंवा कोणता प्रश्न अधिक चांगला होईल हे ठरवा. सर्व वर्गाला सांगण्यासाठी तुमच्याकडे काय आहे? (10 मिनिटे).

तुम्ही गोष्ट सांगण्यापूर्वी, मुलांना माहीत असाव्यात अशा कोणत्या **प्रस्तावना** आहेत? (10 मिनिटे)

प्रत्येक मुलाला शक्य तितक्या चांगल्या प्रकारे गोष्ट **सांगू द्या** (10 मिनिटे)

गोष्टीशी चांगली निगडीत असणारी **पुन्हा सांगण्याची** कृती कोणती आहे? तुम्हांला गटामध्ये करता येईल अशी एखादी कृती निवडा (10 मिनिटे)

# सत्र #7
# शोध आणि प्रतिसाद प्रश्न

गोष्ट सांगितल्यावर त्या अनुषंगाने प्रश्न विचारणे किंवा त्यासंबंधी चर्चा करणे हा गोष्ट सांगण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा घटक आहे! फक्त माहिती किंवा ज्ञान असणे ही सर्वांत महत्त्वाची गोष्ट नाही. पुढाऱ्याने मुलांना गोष्टीचे काही भाग लक्षात ठेवण्यापासून पुढे न्यावे आणि त्यांना त्या गोष्टीमुळे काय वाटते ते सांगायला सांगणे. ह्यामुळे पवित्र आत्म्याला त्यांच्या जीवनामध्ये कार्य करण्याची संधी मिळते, जेणेकरून ते अधिकाधिक येशू ख्रिस्तासारखे होऊ लागतात. लोकांना सखोल ज्ञान व्हावे, आणि त्यांच्या अंतःकरणाचा पालट व्हावा म्हणून स्वतः येशू प्रश्न विचारत असे. चर्चा घडवून आणल्यामुळे मुलांना पवित्र शास्त्रातील खजिना शोधण्यास आणि पवित्र शास्त्र त्यांच्या अंतःकरणात रुजण्यासाठी मदत होते.

तुम्ही प्रश्न विचारता तेव्हा, लोक देवाची सत्ये स्वतःच शोधू लागतात, ती त्यांना सहज सांगितली जात नाहीत. त्यांनी स्वतः ती शोधल्यामुळे त्यांच्या अंतःकरणात ती खोलवर मुळावतात आणि टिकून राहतात. **तुम्हांला काय माहीत आहे ते महत्त्वाचे नाही, तर त्यांनी स्वतः देवाची सत्ये शोधणे महत्त्वाचे आहे!** शोध प्रश्नांमुळे पुढील गोष्टींविषयी चर्चा करता येते.

- **डोके (वस्तुस्थिती)** ह्या प्रश्नांमुळे, गोष्टीत "**काय**" घडले हे लक्षात ठेवण्यास मदत होते.
- **अंतःकरण (भावना)** गोष्ट ऐकल्यावर मुलांच्या मनात ज्या ज्या भावना निर्माण होतात, त्यांची त्यांना अनुभूती घेता यावी म्हणून पुरेसा वेळ द्या, आणि मगत "**मग काय**" किंवा "**का**" ह्यांसारख्या प्रश्नांची उत्तरे देऊ द्या. लोकांच्या प्रतिसादाचा तुम्ही अधिक सखोल रीतीने विचार करू लागता तेव्हा संवेदनशील व्हा आणि पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनावर अवलंबून राहा. केवळ पहिल्याच उत्तरावर समाधान मानू नका.

नंतर, प्रत्येक व्यक्तीने वैयक्तिक प्रतिसाद द्यावा अशा प्रकारे एकदोन प्रतिसाद प्रश्न विचारून चर्चेची समाप्ती होते. ह्या वेळी पवित्र आत्मा तुमच्या गटातील प्रत्येक व्यक्तीशी बोलतो. प्रत्येक व्यक्तीसाठी हा अनुभव कदाचित निरनिराळा असेल. पवित्र आत्मा कार्य करत असल्यामुळे हे चांगले आहे.

पवित्र शास्त्रातील गोष्ट सांगत असताना कधी कधी तुम्ही एखाद्या **विशिष्ट मुद्द्यावर** लक्ष केंद्रित करता. येथे त्यांना काही थेट प्रश्न विचारणे उचित होऊ शकते, पण त्यांनी उत्तर द्यावे म्हणून सक्ती करण्याची आवश्यकता नाही. उजळणी आणि अनुधावन महत्त्वाचे आहे. देवाने प्रत्येक व्यक्तीला सांगितल्यानुसार ती व्यक्ती देवाच्या आज्ञा कशा प्रकारे पाळत आहे ते पाहा. हे प्रश्न पुढीला गोष्टींशी संबंधित असतातः

- हात (परिणाम) – "आता काय"

**ह्या सर्व प्रश्नांची उदाहरणे पान क्र. 29–30 वर आहेत.** सुरुवात करण्यासाठी तुम्ही खालील प्रश्नांचा उपयोग करू शकता. तुम्ही पाठ तयार करत असताना त्यात इतर प्रश्नांची भर घालू शकता. **ही प्रश्नांची यादी नाही, तर पवित्र आत्मा व्यक्तीच्या अंतःकरणात आणि जीवनात काय करू इच्छितो त्याचा शोध आहे.**

**महत्त्वाचे संभाव्य प्रश्नः**

- गोष्ट सांगितली जात असताना तुम्हांला कशाचे आश्चर्य वाटले? (डोके/अंतःकरण)
- गोष्टीचा कोणता भाग तुम्हांला मनापासून आवडला? त्यातील कोणती गोष्ट तुम्हांला आवडली? (डोके)
- ह्या गोष्टीत समजण्यास कठीण असे काही होते का? (डोके)
- लोकांनी कोणते निर्णय घेतले? त्यांव्यतिरिक्त ते अजून काय करू शकले असते? त्यांनी घेतलेल्या निर्णयांमुळे (निवडीमुळे) काय घडले? (डोके)
- देवाविषयी मी जे शिकलो ते... तुम्ही देवावर प्रीती करणे आणि त्याच्यासाठी जगणे (सेवा करणे) यावर त्याचा काय परिणाम होईल? (अंतःकरण)
- तुम्हांला ह्या प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? ज्या बाबतीत देव तुम्हांला मदत करू शकेल असे सध्या तुमच्या जीवनात काय घडत आहे का? (अंतःकरण)
- आजच्या गोष्टीमुळे तुम्ही काय करावे अशी देवाची (पवित्र आत्मा) इच्छा आहे? (हात)

**अधिक जोर देण्याचे मुद्देः**

- तुम्ही डोक्यासंबंधी म्हणजे वस्तुस्थितीसंबंधी प्रश्न विचारता. योग्य उत्तराची अपेक्षा करत नाही. खुला प्रश्न विचारल्यावर, पुष्कळ लोकांना त्याचे उत्तर देऊ द्या. प्रत्येकाच्या उत्तराद्वारे इतरांना शिकण्याची आणि प्रकटीकरण होण्याची संधी मिळावी असा आपण प्रयत्न करत आहोत हे लक्षात ठेवा.
- काही उत्तरांना जोडून अधिक सखोल प्रश्न विचारावेत असे तुम्हांला वाटेल. त्यांच्या प्रारंभिक प्रतिसादानंतर, पवित्र आत्मा त्यांच्याकडून अजून कशाची अपेक्षा करतो हे पाहा. पुढीलप्रमाणे प्रश्न विचारा रू "तुम्हांला असे का वाटले?" किंवा "तुमच्यासाठी हे का महत्त्वाचे आहे?" लोकांना आपले विचार, आपली मते मांडण्यासाठी सुरक्षित वातावरण निर्माण करण्याची खबरदारी घ्या.
- पुढारी ह्या नात्याने तुम्हांला जेव्हा एखादा प्रश्न विचारला जातो, तेव्हा गटामध्ये त्याविषयी चर्चा व्हावी म्हणून तो तुम्ही पुन्हा गटाला विचारा. कारण पुढाऱ्याने उत्तर दिल्यावर बरेचदा संवाद संपतो. पण तो प्रश्न पुन्हा विद्यार्थ्यांनाच विचारल्यावर, त्यांना त्यावर अधिक विचार करण्याची संधी मिळते.
- तुम्हांला जर एखादा प्रश्न विचारला, आणि तुमच्याकडे किंवा गटाकडेही त्याचे उत्तर नसेल, तर प्रश्न चांगला आहे हे मुलांना सांगा आणि त्यासाठी तुम्हांला घरी जाऊन उत्तर शोधावे लागेल याची त्यांना कल्पना द्या.

**प्रशिक्षणार्थ्यांचे 3–4 जणांचे लहान गट तयार करा. एखाद्या व्यक्तीला येशू आणि पेत्र पाण्यावर चालले ही गोष्ट वाचायला सांगा. गटाला हे प्रश्न विचारा आणि पुढील प्रश्न विचारण्याचा सराव कराः**

- **3 डोके (वस्तुस्थितीविषयक) प्रश्न**
- **5 अंतःकरणाशी संबंधित प्रश्न**
- **2 हातध्प्रतिसाद प्रश्न**

**आता गटाने प्रत्यक्ष चर्चा करण्याची वेळ आहे. प्रत्येक गटाला आपला पुढारी म्हणून एकेका व्यक्तीची निवड करायला सांगा. वर दिलेले महत्त्वाचे प्रश्न, तसेच त्यांनी तयार केलेले प्रश्न घेऊन पुढाऱ्याला त्या त्या गटामध्ये चर्चा घडवून आणायला सांगा.**

# शोध आणि प्रतिसाद प्रश्न

## शोध प्रश्न – डोके (वस्तुस्थिती):

- गोष्टीचा आशय समजून घेणे हे माझे उद्दिष्ट आहे.
- ह्या गोष्टीचा मथितार्थ काय? ह्या गोष्टीत काय घडले?
- मला देवाच्या वचनाद्वारे त्याला (देवाला) जाणून घ्यायचे आहे.

a. गोष्ट सांगत असताना तुम्ही काय कल्पना करत होता? गोष्ट ऐकत असताना तुम्हांला कसे वाटले?
b. तुम्ही स्वतः तेथे असल्याची कल्पना करू शकला का? गोष्ट सांगत असताना तुम्ही काय ऐकले/पाहिले/कशाचा वास आला?
c. तुम्ही स्वतः तेथे असल्याची कल्पना करू शकला का? गोष्ट सांगत असताना तुम्ही काय ऐकले/पाहिले/कशाचा वास आला?
d. ह्या गोष्टीमध्ये देव/येशू त्यांना काय शिकवत होता?
e. ह्यापूर्वीच्या कोणत्या गोष्टींमध्ये तुम्ही देवाला असे करताना पाहिले?
f. मागील गोष्टींची आठवण येईल असे काही तुम्ही ऐकले का? तुम्ही काय संबंध जोडला?
g. आपल्या इतर गोष्टींपैकी कोणती गोष्ट याविषयी ____________________ बोलते?
h. समजण्यास कठीण असे काही होते का?
i. देवाचेध्येशूचे लोकांशी संबंध याचे ह्या गोष्टीत कसे वर्णन केले आहे?
j. ह्या गोष्टीमधून ____________________ चे देवध्येशूशी संबंध याविषयी आपण काय शिकलो?
k. ह्या गोष्टीमध्ये देवध्येशू लोकांना कसा प्रतिसाद देतो? त्यावरून आपल्याला काय समजते?
l. .... असे झाल्यावर देवानेध्येशूने काय प्रतिसाद दिला?
m. लोकांनी कसा प्रतिसाद दिला ?
n. देवानेध्येशूने कसा ...?
o. ह्या घटनेद्वारे देवध्येशू त्यांना काय शिकवत किंवा दाखवत होता?
p. पुढील गोष्टींविषयी तुम्ही आज काय शिकला...
   - देव?
   - येशू?
   - ही गोष्ट?
   - येशूला अनुसरणे म्हणजे काय?
   - तुमच्याविषयी?
q. देव/येशू कसा आहे याविषयी आपण काय शिकलो?
r. लोकांनी कशाची निवड केली? त्यापेक्षा वेगळे ते काय करू शकले असते? त्यांनी केलेल्या निवडींमुळे काय घडले?
s. ह्या गोष्टीमध्ये एखाद्या व्यक्तीमध्ये विश्वास, वर्तणूक किंवा दृष्टीकोन या बाबतीत काय बदल झाले?
t. ह्या गोष्टीमधून देवध्येशूविषयी तुमच्या काय लक्षात आले?
u. देवध्येशूचे अनुसरण करण्यामध्ये कशाची जोखीम होती?
v. गोष्टीतील पात्रांमध्ये साम्य किंवा वेगळेपण काय आहे?
w. कोणत्या बाबतीत आपली परिस्थिती ... सारखी आहे?

## शोध प्रश्न – अंतःकरण (भावना):

- सदर गोष्टीशी भावनिक आणि आध्यात्मिक रीतीने जोडले जाऊन तिला माझ्या अंतःकरणात खोलवर शिरू देणे हे माझे उद्दिष्ट आहे. ही गोष्ट माझ्या जीवनाशी कशी संबंधित आहे?
- ही गोष्ट का महत्त्वाची आहे? माझ्यासाठी ती का महत्त्वाची आहे?
- मला देवाच्या वचनाद्वारे त्याच्यावर (देवावर) प्रीती करायची आहे.

a. सदर गोष्टीत तुम्हांला काय आवडले? तुम्हांला आवडले नाही असे काही तिच्यात आहे का?
b. ह्या गोष्टीत कोणती गोष्ट ठळकपणे तुमच्या लक्षात आली?
c. आजच्या गोष्टीतील सर्वांत महत्त्वाचा भाग कोणता होता असे तुम्हांला वाटते?
d. गोष्ट ऐकत असताना तुमच्या मनात कोणत्या भावना आल्या? जर... तर तुम्हांला कसे वाटले असते?
e. गोष्ट ऐकत असताना तुम्ही काय कल्पना करत होता?
f. गोष्ट ऐकत असताना तुम्हांला कोणते प्रश्न पडले होते?
    - कोणत्या भावना ... असे तुम्हांला वाटते?
    - कोणत्या भावना उद्दीपित झाल्या...?
    - ते कशासारखे होते असे तुम्हांला वाटते?
g. ह्या गोष्टीत ____________________ च्या मनात आणि अंतःकरणात काय चालले होते असे तुम्हांला वाटते?
h. आजच्या गोष्टीत तुम्हांला कशाविषयी आश्चर्य वाटले?
i. आजच्या गोष्टीतील कोणत्या पात्राशी तुम्ही अधिक एकरूप होऊ शकता?
j. देवाच्याध्येशूच्या दृष्टीने काय महत्त्वाचे आहे असे तुम्हांला वाटते? व्यक्तीसंबंधात?
k. कोणत्या प्रकारे आपण ____________________ सारखे आहोत? कोणत्या बाबतीत निराळे आहोत?
l. गोष्ट ऐकल्यानंतर स्वतःकडे पाहण्याचा तुमचा दृष्टीकोन कसा बदलू शकेल?
m. देवाने ______________ कधी तुमचा उपयोग करून घेतला का?
n. ______________ असे तुम्हांला का वाटते?
o. देवाने ह्या गोष्टीचा पवित्र शास्त्रात का समावेश केला असावा असे तुम्हांला वाटते?
p. आता तुम्हांला देवाविषयी/येशूविषयी काय वाटते?
q. आजच्या पूर्वी कोणती गोष्ट तुमच्या कधीही लक्षात आली नव्हती?
r. तुम्ही ऐकलेली सर्वांत मनोरंजक गोष्ट कोणती?
s. ह्या गोष्टीने तुम्हांला कसे आवाहन किंवा उत्तेजन मिळते?

## प्रतिसाद प्रश्न – हात (कृती)

- पवित्र आत्म्याचे मार्गदर्शन घेणे आणि गोष्टीतून मी जे शिकलो त्याला प्रतिसाद देऊन ते माझ्या जीवनात लागू करणे हे माझे उद्दिष्ट आहे. ही गोष्ट मी माझ्या जीवनाला कशी लागू करावी?
- ह्या गोष्टीतून मी जे शिकलो त्या बाबतीत मी काय करावे अशी देवाची इच्छा आहे?
- देवाच्या वचनातून मी जे शिकलो त्याचे पालन करून मला देवाची सेवा करायची आहे.

a. तुम्ही तुमच्या जीवनात बदल केलाच पाहिजे असे आजच्या गोष्टीत तुम्ही काय ऐकले?
b. आज तुम्ही जे शिकला, त्यावरून देव/येशू/पवित्र आत्मा तुम्हांला काय करायला सांगत आहे असे तुम्हांला वाटते?
c. देव/येशू/पवित्र आत्मा तुम्हांला काय सांगत आहे?

d. आजच्या गोष्टीमुळे तुम्ही काय किंवा कोणती गोष्टी वेगळेपणाने केली पाहिजे? त्यामुळे देवावरील तुमची प्रीती आणि तुम्ही करत असलेली त्याची सेवा यांमध्ये काय फरक होईल?

e. येशूचे अनुयायी असणे म्हणजे काय ह्याविषयी ह्या गोष्टीतून आपण काय शिकलो? हा बोध तुम्ही ह्या आठवड्यात कसा आचरणात आला?

f. आज आपण देवाला/येशूला कसा प्रतिसाद द्यावा?

g. गोष्ट ऐकल्यानंतर, तुम्ही वेगळेपणाने कसे जगाल?

h. तुम्हांला ह्या प्रकारे देवाला जाणून घ्यायचे आहे का? सध्या तुमच्या जीवनात असे काही घडत आहे का की, ज्या बाबतीत देवध्येशूध्पवित्र आत्मा तुम्हांला मदत करू शकेल?

i. ह्या आठवड्यात ही गोष्ट तुम्ही कोणाकोणाला सांगू शकाल?

j. देवाच्या गोष्टीमध्ये तुमची काय भूमिका असावी अशी देवाची इच्छा आहे असे तुम्हांला वाटते?

## गोष्टीतील लोकांवर लक्ष केंद्रित करारूः

गोष्टीशी संबंधित नसलेल्या विषयाकडे किंवा गोष्टींकडे मुले वळतात तेव्हा काय घडते? त्यांना पुन्हा पुन्हा गोष्टींसंबंधीच उत्तरे द्यायला सांगा. त्याविषयी गोष्ट काय सांगते? चला आपण पाहू.

- **स्पर्शः** काही मुलांचे लक्ष विचलीत होते, किंवा ते दुसऱ्याच विषयाकडे वळतात. असे घडते तेव्हा काय करावे याविषयी काही सूचना पुढीलप्रमाणे.
    - आजच्य गोष्टीत तुम्हांला हे कोठे पाहायला मिळते? आपण आता त्याविषयीच चर्चा करत आहोत.
    - तुम्ही उपस्थित केलेल्या विषयाविषयी आपण कदाचित नंतर चर्चा करू शकू.

- **ईश्वरविज्ञानः** लोकांना देवाविषयी उत्तर द्यायला कठीण असे प्रश्न किंवा विचार असतात रू ह्या गोष्टीत तुम्हांला काय दिसते? देवासंबंधीच्या प्रश्नाविषयी चर्चा करण्याची ही योग्य वेळ आहे की नाही हे पुढारी ह्या नात्याने तुम्ही ठरवले पाहिजे.

- **प्रश्नः** इतर प्रश्न विचारण्यापूर्वी, तुम्ही अगोदर विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी गटाला भरपूर संधीध्वेळ देण्याची खबरदारी घ्या. वेळ असेल तर इतर संबंधित प्रश्न विचारता येतील. थांबणेसुद्धा चांगले आहे. त्यामुळे लोकांना शांत राहून देव त्यांच्यामध्ये करीत असलेल्या कार्याविषयी विचार करता येतो.

# सत्र #8
# अंतिम स्वाध्याय

मुलांचे लहान गट करा. प्रत्येक गटाला पुढीलपैकी एक गोष्ट द्या. जर 12 गट असतील, तर एकापेक्षा अधिक गटांना एकच गोष्ट दिली तरी चालू शकेल.

पुढच्या पानावर दिलेल्या पाठ नियोजन तक्त्याचा उपयोग करून, तुम्ही प्रत्येक गटाने त्यांचा पाठ ठराविक वेळेत पूर्ण करावा म्हणून त्यांना ठराविक वेळ देऊ शकाल.

- पक्षघाती माणसाला बरे करणे: लूक. 5:17–26
- चांगला शोमरोनी: लूक. 10:25–37
- 5000 जणांना जेवू घालणे: योहान. 6:1–14
- दहा कुष्ठरोगी बरे होतात: लूक. 17:11–19
- चिकाटी न सोडणारी महिला: लूक. 18:1–8
- परूशी आणि जकातदाराच्या प्रार्थना: लूक. 18:9–14
- आंधळ्या माणसाला बरे करणे: लूक. 18:35–42
- जक्कय: लूक. 19:1–10
- पेत्र लंगड्या माणसाला बरे करतो: प्रेषित. 3:1–10
- अलीशा आणि विधवेचे तेलाचे भांडे: 2 राजे 4:1–7
- शमुवेल देवाची वाणी ऐकतो: 1 शमुवेल 3:1–14
- दावीद – अभिषिक्त राजा: 1 शमुवेल 16:1–13

प्रत्येक गट पाठ कसा सादर करील हे त्यांना विचारा, तसेच त्यांनी पाठाचे नियोजनही सांगावे. जर एकापेक्षा अधिक गटांना एकच गोष्ट दिली असेल, तर त्यांनी एकत्र येऊन चर्चा करावी आणि पाठाचा सराव करावा. उरलेल्या वेळेत शक्य तितके पाठ सादर करा.

सादरीकरण करत असताना, गोष्टीतील प्रत्येक विभाग सादर करण्यासाठी प्रत्येक गटाने निरनिराळ्या व्यक्तींना सांगावे. वेळेचा अंदाज घेऊन, सुरुवात आणि प्रश्न यांचा केवळ उल्लेख करावा. प्रस्तावना, गोष्ट सांगणे, आणि पुन्हा सांगणे ह्या गोष्टी संपूर्ण वर्गाने किंवा दुसऱ्या एखाद्या लहान गटाने दाखवाव्यात.

सादरीकरण झाल्यानंतर, सादर करणाऱ्या गटाला तुमचा अभिप्राय सांगा. तो कोणकोणत्या बाबतीत सृजनशील होते, आणि कोणकोणत्या बाबी त्यांनी अतिशय चांगल्या प्रकार सादर केल्या हे पाहा. कोणत्या बाबतीत त्यांना अधिक चांगले प्रदर्शन करता आले असते तेही पाहा. विशेषतः कोणकोणत्या बाबतीत गोष्ट तिखटमीठ लावून फुगवली, आणि पवित्र शास्त्राच्या वृत्तान्तानुसार नव्हती ते पाहा.

# पाठनियोजन तक्ता

**सुरुवातः**

- मुलांना त्यांचा वैयक्तिक अनुभव सांगता येईल असा प्रश्न किंवा कृतीची निवड करा.
- उत्तरामुळे मुलाच्या मनातील भावनेला चालना मिळेल का?
- "होय" किंवा "नाही"पेक्षा अधिक उत्तर द्यावे लागेल असा प्रश्न विचारा.

**प्रस्तावनाः**

- ज्यांचा अर्थ सांगावा लागेल असे काही शब्द आहेत का?
- भौगोलिक ठिकाण माहीत असणे महत्त्वाचे आहे का?
- सदर गोष्टीच्या अगोदर अशा काही घटना घडल्या आहेत का, की ज्या समजून घेणे महत्त्वाचे आहे?
- स्पष्ट करणे महत्त्वाचे असतील असे काही सांस्कृतिक फरक आहेत का?
- ज्यांची उजळणी करावी अशा यापूर्वीच्या गोष्टींमध्ये काही बाबी आहेत का?

**गोष्ट सांगणेः**

- मी मुलांना गोष्टीमध्ये सहभागी करून घेऊ शकतो का?
- गोष्ट अधिक मनोरंजक आणि मुले व वक्त्यामध्ये संवाद साधता येतील असे काही घटक गोष्टीमध्ये आहेत का?
- गटाला दाखवण्यासाठी काही दृक् साधने आहेत का?
- गोष्टीमध्ये ज्यांना खुलवावे अशा काही बाबी आहेत का, उदा. नावांची किंवा ठिकाणाची यादी.
- गोष्टीची लांबी मुलांना शिकण्यासाठी आणि इतरांना सांगण्यासाठी सोपी आहे का ?
- गोष्टीत अशी एखादी व्यक्ती आहे का, की ज्यांच्याविषयी मला त्यांच्या अनुभवावरून सांगता येईल?

**पुन्हा सांगणेः**

- माझ्या विद्यार्थ्यांना मनापासून काय करायला आवडते?
- बरेच दिवसात मी वापरला नाही, पण जो मुलांचे लक्ष वेधून घेऊ शकेल असा एखादी उपक्रम आहे का?
- सर्व मुलांना सहभागी होता येईल इतके साहित्य आहे का?
- मुले पवित्र शास्त्राची गोष्ट पुन्हा सांगतात तेव्हा ती पवित्र शास्त्रानुसार अगदी अचूक असते का?

**शोध प्रश्नः**

- ह्या पाठाची चर्चा पवित्र आत्मा कोणत्या दिशेला नेईल हे समजावे म्हणून मी प्रार्थना केली आहे का?
- केवळ बुद्धीला नव्हे, तर अंतःकरणाला भिडतील असे प्रश्न माझ्याकडे आहेत का?
- गोष्टीचा कोणता भाग मुलांना अधिक आपलासा वाटेल? पवित्र आत्मा चर्चा ज्या दिशेकडे वळवत आहेत त्या दिशेला नेणारे प्रश्न माझ्याकडे आहेत का?

**प्रतिसाद प्रश्नः**

- पाठाची समाप्ती मी कशी करणार आहे? – प्रतिसादासाठी कोणता प्रश्न सर्वांत चांगला ठरेल?

# सत्र #9
# समर्पण आणि आशीर्वाद

- प्रशिक्षणार्थ्यांचे मूल्यमापन पूर्ण करा
- प्रमाणपत्रे उपलब्ध झाल्यावर प्रत्येक व्यक्तीला द्या
- ग्रुप फोटो घ्या
- सर्व गटासाठी आशीर्वादाची प्रार्थना करा
- उपलब्ध असेल तर, गीत गा आणि शिकवाः सभा समाप्त करण्याअगोदर आशीर्वाद

# परिशिष्ट


| | पृष्ठे |
|---|---|
| • जगभरातील मुले | 36 |
| • मार्गदर्शक सूचना | 37–38 |
| • बहुविध बुद्धिमत्ता / माहिती | 39 |
| • पवित्र शास्त्रकथा कथनाचा उपयोग करून संकल्पना बदलणे | 40 |
| • किड्स् स्टोरीबोर्ड ट्रेनिंग | 41 |
| • पवित्र शास्त्र कथा कथनासाठी अधिक साधने | 42 |

# जगभरातील मुले

**आमचे सेवाकार्य**

देवाच्या परिवर्तन करणाऱ्या आशेने मुलांची जीवने प्रभावित करणे

**आम्ही अशा आशेच्या संस्कृतीच्या नमुन्यानुसार जीवन जगतो जो:**

रूपांतरण करणाऱ्या
नातेसंबंधविषयक
मनोरंजक आहे



**आमची मार्गदर्शक तत्त्वे**

प्रार्थना
सहभागिता
अभिनव
सामर्थ्यशाली
बहुगुणीकरण
विश्वसनीय

**आमच्या सेवाकार्याचा मुख्य उद्देश**

मुलांवर प्रभाव टाकण्यासाठी आम्ही विश्वासणाऱ्यांच्या समूहांना साधनसामग्री पुरवतो

kids around the world

**किड्स्टोरी मिशन**

मुलांना देवाची गोष्ट सांगणे आणि त्याच्या आत्म्याचे कार्य यांद्वारे त्याच्या जीवन बदलणाऱ्या आशेचा प्रभाव मुलांच्या जीवनावर घडवणे.

**किड्स्टोरी उद्दिष्टे आणि अपेक्षा**

- देवाचे वचन शिकवण्यासाठी गोष्ट सांगण्याचे तंत्र/किड्स्टोरी याचा परिचय करून देणे
- देवाच्या आत्म्याने पुढाऱ्यांच्या आणि मुलांच्या जीवनात कार्य करावे, देवाने लोकांना सामूहिकरित्या किंवा व्यक्तिशः स्वतःकडे आणि इतरांकडे आकर्षित करावे.
- मुलांच्या गटामध्ये किड्स्टोरीच्या पद्धती वापरण्यासाठी आत्मविश्वास
- मुलांनी गोष्ट शिकावी आणि ती स्वतःच्या जीवनाला लागू करावी, तसेच ती त्यांच्या कुटुंबियांना आणि मित्रांनाही सांगावी
- जगभरात किड्स्टोरी कार्यशाळांचे पुढारीपण करण्यासाठी लोक आणि टीम्स तयार करणे.

# मार्गदर्शक सूचना

**प्रशिक्षणार्थ्यांसाठी सूचना**

(तुमचे बायबल स्टोरीचे सत्र सुरू करण्यापूर्वी प्रशिक्षणार्थ्यांसोबत ह्या सूचनांसंबंधी चर्चा करा.)

- **प्रत्येकाचे स्वागत:** प्रत्येकाला सहभागी होता येईल असे सुरक्षित वातावरण आम्हांला निर्माण करायचे आहे.
- **सहभाग:** प्रत्येकजण चर्चेमध्ये सहभागी होईल अशी आशा आहे. तुम्हांला एखादा प्रश्न विचारला, तर “मला माहीत नाही” असे म्हटले तरी चालू शकेल.
    - **एकमत किंवा सर्वानुमती नाही:** बहुतांश वेळा आम्ही केवळ एकाच बरोबर उत्तराची अपेक्षा करत नाही. निरनिराळ्या घटकांच्या आधारे पवित्र आत्मा आपणा प्रत्येकाला निरनिराळे प्रगटीकरण देईल. आपले अनुभव, आपले संगोपन कसे झाले आणि आपल्याला काय माहीत आहे त्यामुळे एकाच गोष्टीला निरनिराळै पैलू मिळतील.
- **मनमोकळे आणि प्रामाणिक असा:** आपण प्रामाणिक असू, आणि आपल्या बाबतीत जे घडत आहे ते इतरांना सांगू तरच आपण देवाच्या आणि इतरांच्या अधिक जवळ येऊ. आपण ज्या गोष्टी करतो त्याच गोष्टी करण्याचा प्रयत्न मुले करतात हे तुमच्या लक्षात येईल.
- **“मी” विधाने:** “मंडळीने” किंवा “त्यांनी” “ते” किंवा “आपण” अशी विधाने करण्याऐवजी, “मी”, माझे, मला इ. विधाने वापरा आणि देव तुम्हांला काय सांगत आहे ते सांगा.
- **केवळ चालू आणि याअगोदरच्या गोष्टी:** आजच्या आणि यापूर्वी अभ्यासलेल्या गोष्टींची चर्चा केल्यामुळे सगळ्यांना त्यात सहभागी होता येते, कारण सगळ्यांना एकसमान माहिती असते. प्रशिक्षणार्थ्यांनी पूर्वी सांगितलेल्या आणि गटात चर्चा केलेल्या गोष्टींपेक्षा निराळ्या गोष्टी किंवा माहिती आणू नये.
- **कल्पनारम्यतेने ऐकणे:** गोष्टी सांगितली जात असताना, तुम्ही प्रत्यक्ष तेथे होता, किंवा त्या गोष्टीचा हिस्सा होता अशी कल्पना करा. तुम्हांला काय दिसते? कसला वास येतो? आणि काय ऐकायला येते? इतर पात्रे काय करत आहेत? तुमच्या मनात कोणत्या भावना येतात?

**पुढाऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना**

- **प्रार्थना:** देवासमोर स्तब्ध राहणे महत्त्वाचे आहे, त्यामुळे पवित्र आत्म्याची वाणी तुम्ही ऐकू शकता. येथे पुढाऱ्याच्या कामगिरीचा प्रश्न नाही, तर हे पवित्र आत्म्याने लोकांच्या जीवनात आणि लोकांच्या जीवनाद्वारे कार्य करणे हे महत्त्वाचे आहे.

- **सहविद्यार्थी:** तुम्हांला सर्व उत्तरे माहीत असलीच पाहिजेत असे नाही – शास्त्रभागातून त्याची उत्तरे शोधायला किंवा विद्यार्थ्यांनी आपले विचार मांडावेत म्हणून त्यांना उत्तेजन द्या. इतर प्रशिक्षणार्थ्यांकडून तुम्हीही शिकणार आहात असे गृहीत धरून तुम्ही कथाकथनाच्या सत्रात जावे.

- **सुरक्षित वातावरण:** कोणतीही गोष्ट शिकण्यापूर्वी लोकांना सुरक्षित वातावरण हवे असते. असे वातावरण खालील गोष्टींना साध्य करता येते

    - **तुमच्या श्रोत्यांना ओळखणे:** आध्यात्मिकरित्या, भावनिकरित्या, वैयक्तिक समस्या

    - **पर्यावरण:** खोलीचे तपमानय खोलीची रचना आणि साधने

    - **मानसिकरित्या:** टोमणे मारू नयेत किंवा उपहास करू नयेय अधिकाधिक उत्तेजन द्या.

    - **आध्यात्मिकरित्या:** पवित्र शास्त्राच्या बाबतीत कोणी एकदुसऱ्यापेक्षा अधिक ज्ञानी नाहीय केवळ येशू ख्रिस्तच सुपरस्टार आहे.

- **देवाच्या हस्तक्षेपाची अपेक्षा करा:** देव त्याच्या गोष्टीने आमच्या गोष्टीला छेद देईल अशी अपेक्षा करा. पुष्कळदा आपण माहितीची अदलाबदल करतो किंवा खूप माहिती सांगण्याचा प्रयत्न करतो.

- **पारदर्शकता:** योग्य असेल तेव्हा, गटाचा सदस्य होणे आणि पारदर्शक होणे चांगले आहे.

- **ऐकणे**

    - **पवित्र आत्मा:** व्यक्तीने दिलेल्या प्रतिसादाचा अधिक सखोल विचार करून अधिक प्रश्न विचार असे पवित्र आत्मा कधी कधी तुम्हांला सुचवील. प्रत्येकाच्याच बाबतीत असे घडेल असे नाही. "येशू, पवित्र शास्त्र, प्रीती, देव" अशा प्रकारची उत्तरे देण्याची लोकांना सवय झाली आहे – योग्य वेळी त्यांना अधिक निश्चित उत्तरे द्यायला सांगणे चांगले आहे.

    - **सहभागी होणारे:** लगेच प्रश्नांची उत्तरे देऊ नका किंवा "मी असे केले असते..." किंवा "तुम्ही... करायला हवे" असे सांगू नका. लोक काय सांगत आहेत त्यामागच्या भावना समजावून घ्या. सहभागी होणाऱ्यांच्या कल्पना आणि भावना व पूर्वीच्या गोष्टी यांची सांगड घाला. शांत राहायला घाबरू नका. आपण शांत, स्तब्ध असतो तेव्हा बरेचदा पवित्र आत्मा आपल्याशी बोलतो.

    - **तुम्ही स्वत:** तुम्ही किंवा तुम्हांला काय माहीत आहे असा हा प्रश्न नाही. तुमच्या डोक्यातील विचार बाजूला ठेवा आणि विद्यार्थ्यी आणि त्यांचे प्रतिसाद यांच्याशी एकरूप व्हा. तुम्हांला उत्तर माहीत असलेच पाहिजे असे नाही. देव तुम्हांला उत्तर सुचवील.

# बहुविध बुद्धिमत्ताध्माहिती

| बुद्धिमत्ता | बलस्थाने | शिकवण |
|---|---|---|
| विपुल शब्दभांडार | • शब्दांचा वापर<br>• ऐकणे<br>• वाचन आणि लिखाण<br>• बोलणे<br>• पाठांतर करणे | • गोष्टी वाचणे अथवा सांगणे<br>• दैनंदिनी लिहिण्याचा वापर<br>• विद्यार्थ्यांना चर्चा करायला लावणे |
| संगीताचे ज्ञान | • गीत<br>• ताल<br>• आवाजाची फेक | • गीतांद्वारे सत्य शिकणे<br>• गीतलेखनाला उत्तेजन देणे<br>• मूड ठीक करण्यासाठी संगीताचा वापर |
| तर्कबुद्धीः गणित आणि अंक | • आकडे<br>• तर्कशुद्ध युक्तिवाद<br>• संघटन<br>• समस्या सोडवणे | • केलेल्या अभ्यासाचे विश्लेषण करणे<br>• शोधक, विचार करायला लावणे प्रश्न विचारणे<br>• समस्या सोडवण्यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग |
| चित्रकार | • कला<br>• चित्रकला<br>• कल्पनारम्यता<br>• चित्रांचा वापर | • चित्रे, पोस्टर्स, नकाशे आणि व्हिडीओचा वापर करणे<br>• विद्यार्थ्यांना जे समजले ते त्यांना चित्रांद्वारे व्यक्त करू देणे<br>• कला आणि हस्तकला उपक्रमाची योजना आखणे |
| शरीरः शारीरिक अनुभव | • अथलेटिक्स<br>• नृत्य<br>• हस्तकौशल्ये<br>• अभिनय | • गोष्टींना नाट्यरूप देऊन ते सादर करणे<br>• शारीरिक हालचाली, खेळ, नृत्य यांचा वापर<br>• विद्यार्थी जो अभ्यास करतात त्याचा त्यांना नमुना बनवू द्या. |
| लोकांशी संपर्कः इतरांशी संवाद साधणे | • इतरांसोबत काम करणे<br>• वादविवाद<br>• इतरांच्या गरजांची जाणीव | • परस्पर संवादाद्वारे शिक्षण (लहान गट इ.) चा वापर<br>• सेवा प्रकल्प राबवणे<br>• एकमेकांना भेटून परस्परांची ओळख करून घेण्यासाठी वेळ देणे |
| स्वतःची<br><br>जाणीव/चिंतन | • स्वतःला समजणे<br>• स्वपरीक्षण<br>• स्वयंप्रेरणा<br>• मनन | • मननासाठी वेळ देणे<br>• अभ्यासाचे वैयक्तिक वेळापत्रक तयार करणे<br>• एकाने एकाला शिकवणे यांसंबंधीची मुलाखत<br>• दैनंदिनी, चित्र रेखाटन |
| निसर्गाची जाणीव | • खुल्या जागा<br>• निसर्गातील गोष्टी | • निसर्गाला जोडणारे उपक्रम<br>• गोष्टी सांगण्यासाठी नैसर्गिक खुल्या जागांचा वापर<br>• चर्चेची सुरुवात करण्यासाठी किंवा उपमा देण्यासाठी निसर्गातील गोष्टींचा वापर करणे |

## पवित्र शास्त्र कथाकथनाचा उपयोग करून विचारसंकल्पना बदलणे (संबंधित मजकूर सिंपली द स्टोरी वेबसाईटवरून घेतला आहे)

बायबल स्टोरीयिंग (पवित्र शास्त्र कथाकथन) शिकत असताना आणि त्याचा वापर करत असताना लोकांच्या विचारसरणीत होणाऱ्या बदलांची काही उदाहरणे पुढे दिली आहेत. काही आव्हाने आशयाच्या बाबतीत तर काही आव्हाने आम्ही प्रशिक्षण देताना ज्या पद्धतींचा वापर करतो त्यांच्या बाबतीत आहेत. ह्या अडचणी प्रत्येकालाच येतील असे नाही, पण आपल्यापैकी बहुतेकजणांना काही समस्या येतीलः

1. माहिती देण्यासाठी लेक्चर देण्याऐवजी प्रश्न विचारणे.
2. प्रश्नांची उत्तरे प्रश्नांनी देणे.
3. शिक्षकावर लक्ष केंद्रित केले जात नाही, तर देवाच्या वचनावर केले जाते.
4. शिकवण्यास लायक नाहीत म्हणून ज्यांना पूर्वी अपात्र ठरवले गेले, त्यांच्यासाठी दार उघडल जाते.
5. विचार करायला लावणारे प्रश्न विचारल्याने, पवित्र आत्म्याला शिकवण्याची संधी मिळते.
6. शिकवण्याच्या अपारंपरिक पद्धतीने परिणाम साध्य होतात.
7. बायबल स्टोरीयिंगमुळे लोक इतरांना शिकवण्यासाठी प्रशिक्षित होतात.
8. निश्चित केलेली उद्दिष्टे सहज साध्य केली जातात.
9. ज्यांना शिकवायचे त्यांच्याद्वारे शिक्षकांनाही प्रभावित होण्याची संधी मिळते.
10. शिकवण्यासाठी लिखित साहित्याची किंवा भौतिक साधनांची गरज पडत नाही.
11. लोकांना ख्रिस्ती परिघामध्ये आणि ख्रिस्ती परिघाबाहेर शिकवण्यासाठी सज्ज केले जाते.
12. लोक जेव्हा शोध घेऊ शकतात, तेव्हा शिक्षक माहिती देणे थांबवतो.
13. माहिती दिली जात नाहीय स्वतःच उत्तर शोधण्यासाठी त्यांना प्रश्नांची मदत होते.
14. उत्साहाने चर्चा केली जाते, पण आशय आणि शिष्टाचार यावर नियंत्रण ठेवल जाते.
15. सुज्ञ विद्यार्थ्यांना माहिती न देता, ती स्वतः शोधण्याचे महत्त्व समजते.
16. शिक्षक ज्यांना शिकवतात त्यांचे मन लावून ऐकायला आणि त्यांच्या सूचनांवर प्रतिक्रिया द्यायला शिकतात.
17. गोष्टीच्या किंवा पवित्र शास्त्राच्या बाहेरची माहिती किंवा साधनांचा वापर केला जात नाही.
18. सुशिक्षित लोक तोंडी सुसंवादाच्या जगात कार्य करायला शिकतात.
19. लिखित टिपणांचा आधार न घेता, पाठाची तयारी करण्याचे आणि वचन गाजवण्याचे कौशल्य मिळते.
20. देवाचे वचन आणि पवित्र आत्मा ह्यांनी जीवने बदलण्याचे कार्य करावे म्हणून त्यांच्यावर भरवसा ठेवणे.
21. एकाच परिच्छेदाचा अभ्यास केल्यामुळे सर्वजण एकाच पातळीवर राहतात आणि त्यांच्यामध्ये ऐक्य निर्माण होते.
22. अगोदर तयार केलेल्या मानसिक मुद्द्यांच्या आधारे चर्चा केली जात नाही.
23. इतरांसाठी मौल्यवान असलेली आध्यात्मिक माहिती तरुण शोधू शकतात.
24. निरक्षर लोकांना देवाच्या वचनातून सखोल आध्यात्मिक सत्य समजू शकते.
25. गोष्टीमध्ये सांगितलेले सत्य, विद्यार्थ्यांना स्वतःच्या जीवनात लागू करण्याची प्रेरणा मिळते.
26. ज्यांचा पवित्र शास्त्राशी परिचय आहे, तसेच ज्यांना त्याबद्दल काही माहिती नाही, असे दोन्ही प्रकारचे लोक एकाच वेळी शिकू शकतात.
27. सामाजिक, आर्थिक आणि वांशिक पूर्वग्रह दूर होतात.
28. स्वतःला श्रेष्ठ समजणारे लोक, देव जसे इतरांचे मूल्य जाणतो, तसे इतरांचे मूल्य जाणायला शिकतात.
29. मनन करणे ही सहजप्रवृत्ती होऊन जाते.
30. एखाद्या छोट्याशा परिच्छेदात किती महान सत्य दडले आहे हे पाहून सर्वजण आश्चर्यचकित होतात.
31. निरक्षर आणि अशिक्षित लोक बारकाने, सूक्ष्म दृष्टीने विचार करू शकतात.
32. बायबल स्टोरीरियंग शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना अधिक सखोलपणे विचार करायला चालना देते.
33. पवित्र शास्त्राचा आशय लक्षात ठेवणे हे वचन पाठ करण्याइतकेच ग्राह्य आणि त्यापेक्षाही सोपे आहे.
34. सुशिक्षित लोक छापील पाने न पाहता पवित्र शास्त्राच्या परिच्छेदांचा अभ्यास करू शकतात.
35. बायबल स्टोरियिंगचा वापर करून लोक सहज नेतृत्व करू शकतात.
36. उपस्थित राहणाऱ्यांच्या गरजा व अडचणींनुसार प्रशिक्षणाच्या वेळापत्रकात बदल करता येतात.
37. शिक्षक आम्हांला सर्वकाही माहीत आहे असा अविर्भाव न आणता उत्सुक शिकणारे बनतात.
38. गोष्टीद्वारे शिक्षण घेतलेले लोक तिचा आशय लक्षात ठेवू शकतात आणि ती गोष्ट इतरांना सांगू शकतात.

# किड्स स्टोरीबोर्ड ट्रेनिंग

**आकृत्या कापणे:**

- आकृत्या अगदी अचूक तपशीलासह न कापता, आकृत्यांच्या आजूबाजूला बरीचशी जागा सोडून कापा.
- मग जी आउटलाईन दिली असेल तिच्यावर कापा.
- तुम्ही एका वेळी एका गोष्टीच्या आकृत्या कापू शकता, किंवा सर्व आकृत्या एकाच वेळी कापून ठेवू शकता.
- आकृत्या स्वच्छ राहाव्यात म्हणून स्टोरीबोर्ड हाताळण्यापूर्वी तुमचे हात स्वच्छ धुवा.

**आकृत्या सांभाळून ठेवणे**

- चांगली काळजी घेतली तर हे साहित्य दीर्घकाळ टिकेल.
- सर्व आकृत्या किटमध्ये (बॅग इ.) ठेवा.
- किटमधून आकृत्या काढल्यानंतर, त्याचे काम झाल्यावर शक्य तितक्या लवकर पुन्हा किटमध्ये ठेवा.
- प्लास्टिक पिशव्या किंवा कागदाच्या पाकिटांमध्ये ठेवा.
- क्रमांक किंवा टाईपनुसार छाननी करा.

**तयारी:**

- आकृत्यांसोबत केवळ तुम्हीच सराव करा. मुलांसमोर कधीही करू नका. त्यांच्यासाठी ते आश्चर्य राहू द्या.
- सर्व आकृत्या बोर्डवर लावून झाल्यावर, शेवटच्या आकृतीपासून सुरुवात करून त्या पुन्हा काढा. म्हणजे तुम्ही जर त्या आकृत्या किंवा ती चित्रे तुमच्या बायबलमध्ये एकावर एक ठेवणार असाल, तर तुम्हांला लागणारे पहिले चित्र किंवा पहिली आकृती वर राहील. येशू मुलांना आशीर्वाद देतो ह्या गोष्टीचे प्रात्यक्षिक.
- मुले येण्यापूर्वी बोर्डवर देखावे आणि आवश्यक असणारी पार्श्वभूमी चिकटवून ठेवा. ते पाहिल्यावर मुले उत्साहित होतील.

  येशू मुलांना आशीर्वाद देतो ह्या गोष्टीचे प्रात्यक्षिक
- इ मुले येण्यापूर्वी बोर्डवर देखावे आणि आवश्यक असणारी पार्श्वभूमी चिकटवून ठेवा. ते पाहिल्यावर मुले उत्साहित होतील.

  येशू मुलांना आशीर्वाद देतो ह्या गोष्टीचे प्रात्यक्षिक.
- मुले वर्गात येतील तेव्हा, त्यांच्या हातात एखादी आकृती द्या म्हणजे ती तुम्हांला मदत करतील. तुम्ही त्यांना बोलावल्यावर त्यांनी येऊन त्यांच्याजवळचे चित्र बोर्डवर चिकटवावे असे त्यांना सांगा. गडबड, गोंधळ करणाऱ्या मुलांसाठी हे अधिक प्रभावी आहे, त्यामुळे ते काळजीपूर्वक लक्ष देतात आणि योग्य ठिकाणी चित्र चिकटवतात.

**हिन्ट्स (संकेत):**

- तुमच्या बोर्डवरील देखावा पाहा. लहान आकृती तुम्ही जर बोर्डवर अगदी वर ठेवल्या, तर त्या खूप दूर असल्याचा भास तुम्हांला निर्माण करता येईल.

  हरवलेल्या मेंढराचे प्रात्यक्षिक दाखवा.
- आकृत्या खूप उंच चिकटवू नका. त्यांना सरळ आणि समान पातळीवर ठेवा.

  लोकांच्या आकृत्यांचे प्रात्यक्षिक दाखवा.
- गोष्ट वास्तवादी दाखवण्याचा प्रयत्न करा.
- तुमच्या कल्पनाशक्तीचा वापर करा. सर्जनशील व्हा.

# बायबल स्टोरिइंग रिसोर्सेस

इंटरनॅशनल मिशन बोर्ड (आयएमबी) www.imb.org

- पुट स्टोरिइंग इन द सर्च लाइन

इंटरनॅशनल ओरॅलिटी नेटवर्क www.internationaloralitynetwork.com

- रिसोर्सेस
- फेसबुकः इंटनॅशनल ओरॅलिटी नेटवर्क

स्टीवन जेम्स www.stevenjames.net

- रिसोर्सेस अन्ड डाउनलोडेबल नोट्स (बुकः क्रिएटिव स्टोरीटेलींग गाईड, स्टॅन्डर्ड पब्लिकेशन्स 2002.)

किड्स अराउंड द वलर्ड www.kidsaroundtheworld.com

- किड्स स्टोरीबोर्ड सेट्स, करिक्युलम, ट्रेनिंग मटेरिअल्स
- फेसबुकः किड्स अराउंड द वर्ल्ड; किडस्टोरी

मिशेल नोवेली

- बुकः शेप्ड बाय द स्टोरी. झोंडरवन. 2008

ओरॅलिटी स्ट्रॅटेजीज www.oralitystrategies.org

- स्टोरी सेट्स, व्हिडीओज, आर्टिकल्स
- फेसबुकः ओरॅलिटी स्ट्रॅटेजीज

रिअल लाईफ मिनिस्ट्रीज/नॅवप्रेस www.rlmchurchtraininganddevelopment.com

- बुक्स अन्ड करिक्युलम
- वॉक थ्रु द बायबल. स्टोरी थ्रु द बायबल. 2011

सिम्पली द स्टोरी अन्ड गॉड्स स्टोरी प्रोजेक्ट www.SimplytheStory.com www.gods-story.org

- ट्रेनिंग, रिसोर्सेस अन्ड डाउनलोडेबल हॅन्डबुक

मार्क स्नोडन www.truthsticks.com

- बुकः ट्रुथ दॅट स्टीक्स विथ अव्हेरी विलीस, नॅवप्रेस. 2010
- फेसबुकः ट्रुथस्टीक्स

स्क्रिप्चर इन युज www.siutraining.org

- डाऊनलोड मेकिंग डिसायपल्स ऑफ ओरल लर्नर्स; ऑनलाइन ट्रेनिंग, रिसोर्सेस, आर्टिकल्स

सोमा कम्युनिटीज www.somacommunities.org/soma-school

- ट्रेनिंग, करिक्युलम

एसटी4टीः www.storyingt4t.ning.com

- ट्रेनिंग मॅन्युअल अन्ड स्टोरीज स्पेसिफिकली फॉर डिसायपलींग चिल्ड्रेन (एसटी4किड्स)

स्टोरी4ऑल www.story4all.com

- विकली पॉडकास्टः स्टोरी4ऑल ऑन आयट्युन्स

जॉन वॉल्श www.bibletelling.com

- ट्रेनिंग, करिक्युलम (बुकः द आर्ट ऑफ स्टोरीटेलिंग. मूडी पब्लिशर्स. 2003)
- फेसबुकः बायबलटेलिंग

kids around the world

www.kidsaroundtheworld.com